cmyk

**संपादकीय**

### आयोग आणि ‘सुप्रीम’ने धडा घ्यावा

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये निर्माण झालेल्या गोंधळाने महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर नवे आव्हान उभे केले आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद आणि नागपूर खंडपीठांनी दिलेल्या निर्देशांनी राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उभे केले आहे.


दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com | नवी दिशा... नवे विचार..... | email:rajyaloktantra75@gmail.com

● पुणे ● अहिल्यानगर ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२१८ | शुक्रवार दि.०५ डिसेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


# मुख्यमंत्री म्हणाले शेतकरी कर्जमाफीवर बोलायचं नाही

## सहकारमंत्री बाबासाहेब पाटलांची कबुली; दगाफटका केला तर फासावर जाण्याची तयारी–कडू

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी कराड येथील स्वर्गीय यशवंतराव चव्हाण समाधीस्थळी अभिवादन केले. यावेळी सहकार मंत्र्यांचे अज्ञान समोर आले असून माध्यमांपासून पळ काढताना आढळून आले. तर शेतकऱ्यांच्या कर्जमाफीवर बोलायचं नाही असं मुख्यमंत्री सांगितल्याची कबुली बाबासाहेब पाटील यांनी दिली.**



यशवंतराव चव्हाण पुण्यतिथीला सरकारमधील कोणी आले नाही असे प्रसारमाध्यमांनी विचारले असता, मंत्री म्हणाले की, मला याबाबत माहिती नाही. बँका बुडवणाऱ्यांवर कारवाईसाठी सिस्टीममुळे वेळ लागत असल्याचे मंत्री बाबासाहेब पाटील म्हणाले. लेखापरिक्षणात अ वर्ग तरी संस्था, बँका बंद पडतात. त्यावर कायदा दुरूस्ती करणार असल्याचे बाबासाहेब पाटील म्हणाले. कर्ज



घेणाऱ्या आणि बुडवणाऱ्या कारखान्यांवर कारवाई होणार का? असं देखील त्यांना विचारण्यात आले, यावेळी सहकारमंत्री म्हणाले की, कारखान्यांची यादी पत्रकारांनीच द्यावी असे म्हणाले. मग सहकार खाते काय करतयं? असा सवाल देखील उपस्थित केला जात आहे. कर्जमाफी विषयावर बोलायचं नाही असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितल्याचे मंत्री बाबासाहेब पाटील म्हणाले. कर्जमाफीमुळं सहकार खात्यावर किती बोजा कमी होईल, ◀◀ पान २ वर

## थोडक्यात...

### भाजप प्रवेशावरून कल्याण–डोंबिवलीमध्ये संघर्ष पेटला

**मुंबई :** शिंदे शिवसेना आणि भाजपमधील तणाव दिवसेंदिवस वाढत आहे. नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या निवडणुकीच्या निमित्ताने दोन्ही पक्षामध्ये झालेले आरोप–प्रत्यारोप आणि शिवसेना पदाधिकाऱ्यांना भाजपमध्ये प्रवेश देण्यावरून दोन्ही पक्षांमध्ये संघर्ष सुरू झाला होता. अगदी पक्षनेतृत्वापर्यंत याची दखल घेत एकनाथ शिंदे यांनी दिल्लीत धाव घेतली होती. त्यानंतरही शिवसेना पदाधिकाऱ्यांना भाजपमध्ये प्रवेश देण्याचे कार्यक्रम सुरू असल्यामुळे बुधवारी (३ डिसेंबर) शिवसेनेचे कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे आणि शहरप्रमुख राजेश कदम यांनी थेट पत्रकार परिषद घेत रविंद्र चव्हाण यांचा निषेध केला.

### कांदा साठवणूक घोटाळ्या–संबंधी चौकशीचे आदेश

**दिल्ली :** केंद्र सरकारच्या माध्यमातून किंमत स्थिरीकरण निधी योजनेअंतर्गत ‘नाफेड’ व ‘एनसीसीएफ’ यांच्या माध्यमातून होणाऱ्या कांदा खरेदीमध्ये आर्थिक गैरव्यवहार व साठवणूक घोटाळ्याच्या मुद्द्यावर पिंपळगाव बसवंत (ता. निफाड) येथील शेतकरी विश्वास माधवराव मोरे यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. यासंबंधी १५ सुनावण्या झाल्या आहेत. अखेर उच्च न्यायालयाने २० हजार कोटींपेक्षा अधिकच्या कांदा साठवण घोटाळ्याबाबत चौकशी सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. केंद्राकडून कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी दिल्या जाणाऱ्या निधीचा ७५ टक्के दुरुपयोग करून काही शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन होऊन ‘मनी लाँड्रिंग’ करण्यात येत असल्याचा मुद्दा चर्चेत आहे. यासंबंधीच्या याचिकेवर १५ वी सुनावणी न्यायमूर्ती रणजित सिंह राजा भोसले, ए. एस. गडकरी यांच्यासमोर झाली.

### बॉम्बची धमकी विमान मुंबईकडे वळवले

**मुंबई :** मदीनाहून हैदराबादला जाणाऱ्या विमानाला बॉम्बची धमकी मिळाल्यानंतर काही तासांमध्येच हैदराबादला जाणाऱ्या इंडिगोचे आणखी एक विमानालाही अशीच धमकी मिळाली. शारजाहहून उड्डाण करणारे विमान मुंबईकडे वळवण्यात आले.

माहितीनुसार, इंडिगो विमानाने युएईमधील शारजाह येथून उड्डाण केले. हे विमान हैदराबादला जाणार होते. तथापि, बॉम्बची धमकी मिळाल्यानंतर ते हवेतच वळवण्यात आले आणि मुंबईत उतरवण्यात आले. त्यापुर्वी सौदी अरेबियातील मदीनाहून हैदराबादकडे निघालेल्या इंडिगोच्या एका विमानाला बॉम्बची धमकी मिळाल्यानंतर मोठी खळबळ उडाली. या धमकीमुळे तातडीची खबरदारी म्हणून गुरुवारी दुपारी हे विमान गुजरातमधील अहमदाबाद येथील सरदार वल्लभभाई पटेल आंतरराष्ट्रीय विमानतळावर आपत्कालीन स्थितीत उतरवण्यात आले.

### परवानगीशिवाय महिलेचा फोटो काढणे गुन्हा नाही –कोर्ट

**नवी दिल्ली :** एखादी महिला एकांत किंवा खासगी गोष्ट करत नसेल तर तिचे फोटो किंवा व्हिडिओ तिच्या परवानगीशिवाय घेतले तरी तो भारतीय दंड विधान कलम ३५४–सी नुसार चोरून पाहणे किंवा रेकॉर्ड करणे गुन्ह्याखाली येत नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले. तसेच अशा प्रकरणांमध्ये आरोपपत्र दाखल करताना पोलिसांनी आणि आरोप निश्चित करताना सत्र कोर्टाने अधिक सावधगिरी बाळगणे आवश्यक होते, असे मतही न्यायमूर्ती एन. के. सिंह आणि न्यायमूर्ती मनमोहन यांच्या खंडपीठाने व्यक्त केले. कोलकाता येथील सॉल्ट लेक येथील एक निवासी मालमत्तेवरुन दोन भावांमध्ये दीर्घकाळापासून वाद सुरु आहे. याच वादातून सह–मालकाचा मुलावर गुन्हा दाखल झाला होता.

# वर्षभरात टोल बूथ प्रणाली बंद होणार !

## केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची माहिती

**नवी दिल्ली । वृत्तसेवा**

केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी गुरुवारी लोकसभेत सांगितले की, पुढील एका वर्षात महामार्गावरील सध्याची टोल वसुली प्रणाली बंद होईल. त्याऐवजी पूर्णपणे इलेक्ट्रॉनिक, बॅरियर–लेस टोल प्रणाली लागू केली जाईल.

ते म्हणाले की, नवीन प्रणालीची सुरुवात सध्या १० ठिकाणी करण्यात आली आहे आणि एका वर्षाच्या आत ती संपूर्ण देशात लागू करण्याचे उद्दिष्ट आहे. त्यांनी सांगितले की, सध्या देशभरात सुमारे ४,५०० महामार्ग प्रकल्प सुरू आहेत, ज्यांची एकूण किंमत अंदाजे १० लाख कोटी रुपये आहे. आधी टोल प्लाझावर गाड्यांना



### बॅरियर–लेस टोलिंग कसे काम करेल?

सरकार आता फास्टॅगसोबत ऑटोमॅटिक नंबर प्लेट रिकग्निशनसारखे तंत्रज्ञान जोडून बॅरियर–लेस टोलिंग लागू करत आहे, जेणेकरून गाड्यांना टोलसाठी थांबावे लागणार नाही. एएनपीआरकॅमेरे गाडीची नंबर प्लेट ओळखतात आणि फास्टॅग रीडर आरएफआयडी टॅग वाचून टोलची रक्कम वसूल करतात, ज्यामुळे संपूर्ण प्रक्रिया काही सेकंदात आपोआप पूर्ण होते.

### रोख पैशाचा व्यवहार नसणार

या प्रणालीअंतर्गत टोल प्लाझावरील मोठे बॅरियर, लांबच लांब रांगा आणि रोख पैसे देण्याची सक्ती ब–याच अंशी संपुष्टात येईल. ज्या वाहनांजवळ वैध फास्टॅग नसेल किंवा जे नियम मोडतील, त्यांना ई–नोटीस आणि दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागू शकते, जसे की फास्टॅग निलंबित करणे किंवा वाहन डेटावर दंड आकारणे.

थांबून रोख किंवा कार्डने पैसे भरावे लागत होते, नंतर फास्टॅग आल्याने थांबण्याचा वेळ कमी झाला, आता पुढील पाऊल बॅरियर–लेस म्हणजेच बॅरियर नसलेल्या हायटेक टोलच्या दिशेने आहे. नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने नॅशनल इलेक्ट्रॉनिक टोल कलेक्शन ◀◀ पान २ वर

# भाजप राष्ट्रीय अध्यक्षांच्या निवडीसाठी दिल्लीत खलबतं




**नवी दिल्ली । वृत्तसेवा**

भाजपच्या नवीन राष्ट्रीय अध्यक्षांच्या निवडीची वेळ अखेर जवळ आली असल्याची चर्चा पुन्हा सुरू झाली आहे. संसद भवनात भाजपचे वरिष्ठ नेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यात बुधवारी झालेली एक महत्त्वाची बैठक याला कारणीभूत ठरली. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचे नाव यामध्ये पुन्हा आघाडीवर आले आहे. त्यामुळे देशात नरेंद्र, भाजपाध्यक्षपदी धर्मेंद्र अशी चर्चा रंगली आहे.

पंतप्रधानांच्या दालनात झालेल्या या उच्चस्तरीय बैठकीला केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा आणि संघटन सरचिटणीस बी. एल. संतोष उपस्थित होते. राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या घोषणेच्या मागे–पुढे उत्तर प्रदेश व अन्य काही राज्यांतील प्रदेशाध्यक्षांच्या व संघटनात्मक ◀◀ पान २ वर

# सरकार आम्हाला पुतीन यांना भेटू देत नाही

## नाराज राहुल गांधी यांनी मनमोहन सिंगांची दिली आठवण करून

**दिल्ली । वृत्तसेवा**

रशियाचे राष्ट्रपती व्लादिमीर पुतीन हे दोन दिवसांच्या भारत दौऱ्यावर आले आहेत. गुरूवारी (दि. ४ डिसेंबर) पासून हा दौरा सुरू झाला आहे. मात्र राहुल गांधी यांनी केंद्र सरकार काही संकेत आणि परंपरा पाळत नसल्याचा आरोप करत नाराजी व्यक्त केली आहे. राहुल गांधी यांनी केंद्र सरकार कोणत्याही परदेशी नेत्याला विरोधी पक्षनेत्यांची भेट घेऊ देण्याची परवानगी देत नाही. हे सरकार जुने संकेत पाळत नाही असे वक्तव्य संसदेच्या आवारात पत्रकारांशी बोलताना केले.

राहुल गांधी पत्रकारांशी बोलताना



म्हणाले, सर्वसाधारणपणे परंपरा अशी होती की, कोणताही दुसऱ्या देशाचा उच्चपदस्थ भारतात आला की तो भारताच्या विरोधीपक्ष नेत्याची भेट घेत होता. ही परंपरा वाजपेयी यांच्या सरकारमध्ये सुरू होती. मनमोहन सिंग यांच्या सरकारमध्ये सुरू होती. ◀◀ पान २ वर

# आज व्यापाऱ्यांचा राज्यव्यापी बंद

**नवी मुंबई । प्रतिनिधी**

कृषि उत्पन्न खरेदी–विक्री अधिनियम, १९६३ मधील कालबा तरतुदी रद्द करून नवा आणि व्यवहार्य कायदा लागू करण्याच्या मागणीसाठी राज्यातील व्यापारी संघटनांनी शुक्रवार, ५ डिसेंबर रोजी राज्यव्यापी बंद पुकारला आहे. महाराष्ट्र चेंबर, कॅमिट, एफएएम, जीआरओएमए, पूना मर्चंट्स चेंबर यांसारख्या राज्यातील प्रमुख व्यापारी संघटनांनी या ‘बंद’ला पाठिंबा दिला असून राज्यभरातील बाजारपेठा, मंडई आणि घाऊक व्यापार उद्या बंद राहण्याची शक्यता आहे.

व्यापाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, साठ वर्षांपूर्वी बनवलेला कृषि उत्पन्न खरेदी–विक्री अधिनियम आजच्या बाजारपेठेच्या परिस्थितीला सुसंगत नाही. एफएसएसएआय, लीगल मेट्रोलॉजी, जीएसटी असे अनेक कायदे लागू झाल्याने




व्यापार पद्धती, पॅकिंग, मोजमाप, प्रक्रिया मालाची हालचाल आणि ग्राहक सवयी मोठ्या प्रमाणात बदलल्या आहेत. परंतु कृषि कायद्यात त्यानुसार सुधारणा न झाल्याने व्यापाऱ्यांवर अन्यायकारक बंधने येत असल्याचा आरोप संघटनांनी केला आहे. ‘नियमन केवळ शेतकरी मालापुरतेच मर्यादित असावे’, अशी व्यापाऱ्यांची मुख्य मागणी आहे. मूळ कायद्यानुसार फक्त शेतकऱ्यांकडून येणाऱ्या मालावर नियमन होते. मात्र नंतर तेच नियमन व्यापारी, उद्योग आणि परप्रांतीय–परदेशी मालावरही लागू करण्यात आले. जिथे कोणतीही सुविधा बाजार समितीकडून दिली जात नाही, तिथेही शुल्क आकारले जाते. याचा थेट फटका ग्राहकांना बसतो आणि भाववाढ होते,असे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे. राज्य शासनाने काही बाजार समित्यांना राष्ट्रीय बाजार समिती दर्जा देण्यासाठी काढलेल्या अधिसूचनेत त्रुटी असून ती कायद्यात रूपांतरित करण्याआधी व्यापारी प्रतिनिधींशी चर्चा आवश्यक असल्याचेही संघटनांनी स्पष्ट केले. तसेच प्रत्येक तालुक्यात एक बाजार समिती या धोरणासाठी वस्तुनिष्ठ निकषांची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. विशिष्ट कृषिमालाचे किमान पन्नास टक्के उत्पादन कार्यक्षेत्रात असल्यासच त्याचे नियमन करण्याचा अधिकार द्यावा, अशी मागणी व्यापा–यांकडून मांडण्यात आली आहे. व्यापाऱ्यांनी बाजार समित्यांच्या कामकाजात ◀◀ पान २ वर

# जय पवारांच्या लग्नाला शरद पवार कुटुंबियांची दांडी

**पुणे । प्रतिनिधी**

सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जय पवार या धाकट्या मुलाचे बहरीनमध्ये लग्न होणार आहे. या लग्नाच्या निमित्ताने सर्व पवार कुटुंब एकत्र जमले असताना अजित पवारांचे बंधू श्रीनिवास पवार यांनी मात्र या लग्नापासून स्वत:ला दूर ठेवले आहे. यामुळे पवार कुटुंबात भाऊबंदकी सुरू झाल्याची चर्चा



राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

श्रीनिवास पवार यांचे सुपुत्र तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे तरुण नेते युगेंद्र पवार यांचे गत महिन्याच्या शेवटी मुंबईत लग्न झाले होते. अजित पवारांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या प्रचाराचा दाखला देत या लग्नापासून स्वत:ला दूर ठेवले होते. पण त्यांच्या पत्नी तथा मुलांनी या लग्नाला हजेरी लावली होती. त्यावेळी युगेंद्र यांनी बारामती विधानसभा मतदारसंघातून अजित पवारांना आव्हान दिल्यामुळे ते त्यांच्या लग्नाला गेले नाहीत काय? अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली होती. त्यानंतर आता अजित पवार यांचे बंधू श्रीनिवास ◀◀ पान २ वर

# भीमा कोरेगाव हिंसाचार प्रकरणी प्रा.हॅनी बाबू यांना जामीन मंजूर

**मुंबई । प्रतिनिधी**

भीमा कोरेगाव हिंसाचार प्रकरणी २०१८ मध्ये अटक झालेले दिल्ली विद्यापीठाचे प्राध्यापक हॅनी बाबू यांना गुरूवारी (दि. ४ डिसेंबर) मुंबई उच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला. या प्रकरणाचा तपास करणाऱ्या राष्ट्रीय तपास यंत्रणेनेउच्च न्यायालयाच्या या



निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देता यावे, यासाठी आदेशाला स्थगिती देण्याची मागणी केली. मात्र, बाबू हे साडेपाच ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०१ डिसेंबर २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २०.०० क्विंटल | २,४३० | ३,०३१ | २,७५६ |
| ज्वारी/हायब्रिड : ४२.०० क्विंटल | १,८०० | ३,२३० | २,७४९ |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | १,६२६ | १,६२६ | १,६२६ |
| तूर : ३.५० क्विंटल | ६,४०० | ६,४०० | ६,४०० |
| उडीद :१८.०० क्विंटल | ३,५०० | ५,१६० | ४,६१५ |
| बाजरी: १९.५० क्विंटल | २,६०० | ३,२०० | २,९५० |
| मुग: २.५० क्विंटल | ६,८०१ | ७,२०१ | ७,००१ |
| सोयाबीन: १७५.५० क्विंटल | ३,६०० | ४,५५० | ४,३६४ |
| हरभरा: १.०० क्विंटल | ५,२०० | ५,२०० | ५,२०० |

# राज्यातील राजभवनाचे नाव आता लोकभवन



**मुंबई । प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या पंतप्रधान कार्यालयाचे नाव बदलल्यानंतर आता महाराष्ट्रातील राजभवनचे नावही बदलण्यात आले आहे. राज्याचे राजभवन आता लोकभवन या नवीन नावाने ओळखले जाणार आहे. राज्य सरकारने या बाबत अधिसूचना जारी केली असून त्याची तात्काळ अंमलबजावणी केली जाणार आहे.

राजभवनच्या सचिवांच्या नावाने एक अधिसूचना जारी करण्यात आली असून त्यामध्ये राजभवनचे नाव लोकभवन असे करण्यात आल्याचा आदेश आहे. महाराष्ट्राचे राज्यपाल या ठिकाणी वास्तव्य करतात. राज्यातील राज्यापालांच्या आदेशाने आणि केंद्रीय गृहमंत्रालयाशी चर्चा केल्यानंतर राजभवनचे नाव बदलण्यात आले आहे. यापुढे राजभवन हे लोकभवन या नवीन नावाने ओळखले जाईल, असे आदेशात म्हटले आहे.या अगोदर केंद्र सरकारने पंतप्रधान कार्यालयाचे नाव बदलून सेवा तीर्थ असे ठेवले आहे. लवकरच पीएमओ नवीन कॉम्प्लेक्समध्ये स्थलांतरित होणार असून त्या इमारतीलाच सेवा ◀◀ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# आयोग आणि 'सुप्रीम'ने धडा घ्यावा

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये निर्माण झालेल्या गोंधळाने महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर नवे आव्हान उभे केले आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद आणि नागपूर खंडपीठांनी दिलेल्या निर्देशांनी राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उभे केले आहे. नगरपालिका, नगरपंचायती, ग्रामपंचायती, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदांच्या निवडणुकांसाठी नवीन नियमावली दहा आठवड्यांत तयार करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. हे निर्देश केवळ तात्कालिक उपाय नाहीत, तर निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेसाठी एक मोठे पाऊल आहे. मात्र, या संपूर्ण प्रकरणातून दिसून येत आहे की, सर्वोच्च न्यायालयाने ठरवलेल्या ३१ जानेवारीपर्यंतच्या मुदतीत निवडणुका उरकण्याच्या घाईत आयोगाकडून अनेक चुका होत आहेत. यावर राजकीय नेतेही भाष्य करत नाहीत हे दुर्दैव. खरे तर हा गोंधळ टाळण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने आपल्या आदेशात बदल करून निवडणूक प्रक्रिया पार पाडण्याची ३१ जानेवारीची मुदत ३१ मार्च किंवा एप्रिल अखेरपर्यंत वाढवावी, अशी मागणी निवडणूक आयोग आणि सर्व राजकीय पक्षांनी केली पाहिजे. कारण, नगरपालिका निवडणुकीत झालेल्या गोंधळाच्या प्रकरणांची सुरुवातच मुळी प्रभागांतील उमेदवारी अर्जांच्या अवैधतेवरून झालेल्या पेचप्रसंगापासून होते. औरंगाबाद खंडपीठाने मंगळवारी स्पष्ट केले आहे की, असा पेच टाळण्यासाठी नवीन नियमावली तयार करावी. आयोगाने आठ आठवडे मुदत मागितली, मात्र न्यायालयाने दोन आठवडे अधिक दिले. कारण पुन्हा गोंधळ घातला जाऊ नये! आता २४ नगरपालिका आणि १५४ सदस्यांच्या निवडणुका २० डिसेंबरला होऊन दोन्ही टप्प्यांतील निकाल २१ डिसेंबरला जाहीर करण्याचे आदेश नागपूर खंडपीठाने दिले. हे सर्व निवडणुका निष्पक्ष आणि पारदर्शक राहाव्यात यासाठी आहे. न्यायालयाने निरीक्षण नोंदवले आहे की, टप्प्याटप्प्याने मतमोजणी घेण्याचा निर्णय न्याय्य नाही. ३ डिसेंबरच्या निकालाचा २० डिसेंबरच्या निवडणुकीवर परिणाम होऊ शकतो, ज्यामुळे निष्पक्षता धोक्यात येऊ शकते. या निर्णयामुळे राजकीय नेत्यांच्या प्रतिक्रिया उमटल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाराजी व्यक्त केली, तर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी 'निवडणूक आयोग आणि न्यायालय यांच्याबद्दल न बोललेलं बरं!' असे प्रतिपादन केले. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी तर 'देशात अक्षरश: मनमानी सुरू आहे' अशी थेट टीका केली. या प्रतिक्रियांमधून दिसते की, राजकीय पक्षही त्रस्त आहेत. टीका केवळ आयोगावर नाही, तर संपूर्ण प्रक्रियेवर आहे. दोन दिवसांपूर्वी २० जिल्ह्यांतील काही नगरपालिकांच्या प्रभागांत निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या. यात पुणे, सोलापूर, चंद्रपूर, यवतमाळ, अहिल्यानगर, धाराशिव, नांदेड, ठाणे यांचा समावेश आहे. कार्यकर्त्यांचा हिरमोड झाला असून, ईव्हीएम सुरक्षित ठेवण्यासाठी प्रशासनावर ताण येणार आहे. २१ डिसेंबरपर्यंत ईव्हीएम सुरक्षित ठेवणे हे आव्हान आहे, जे प्रशासनाच्या क्षमतेवर आणि निष्पक्षतेवरही प्रश्न उपस्थित करते. या संपूर्ण प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाच्या मुदतीचा दबाव हे मुख्य कारण आहे. ३१ जानेवारीपर्यंत सगळ्या निवडणुका उरकण्याच्या घाईत आयोगाकडून, अधिकाऱ्यांकडून चुका होत आहेत. नगरपालिका निवडणुकीत अर्ज दाखल करणे, छाननी आणि चिन्ह वाटप यात केवळ पाच दिवसांचे अंतर ठेवले गेले. चिन्ह मिळाल्यानंतर सहाव्या दिवशी मतदान उरकले. यामुळे अपक्ष उमेदवार आणि छोट्या आघाड्यांना प्रचाराची संधीच मिळाली नाही. मोठ्या पक्षांच्या नेत्यांनाही सभा घेणे कठीण झाले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना शेवटच्या १५ मिनिटांसाठी विमानतळावरून धावत जावे लागले, तर शरद पवार, उद्धव ठाकरे, राज ठाकरे आणि देवेंद्र फडणवीस यांच्या सभांवर मर्यादा आल्या. केवळ सहा दिवसांत प्रचार उरकणे हे लोकशाहीसाठी घातक आहे. विरोधी पक्षांना संसाधनांची कमतरता असताना तर संसाधने असून वेळ न पुरल्याने सत्ताधारी पक्षांवरही ताण पडला. जनता आणि नेत्यांमधील संवादाच्या सभाच अनेक ठिकाणी झाल्या नाहीत. त्यामुळे ही निवडणूकच अपूर्ण राहिली आहे. निवडणुकीतील ही घाई लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांना धक्का देते. पारदर्शकता, निष्पक्षता, निर्भयता आणि पुरेसा प्रचार वेळ हे लोकशाहीचे आधारस्तंभ आहेत. मात्र, मुदतीच्या दबावात हे सर्व दुर्लक्षित राहिले. खुद्द सत्तेतील पक्षांनी पैसे वाटप आणि अधिकाऱ्यांच्या कारभारावर आक्षेप घेतले. पंचायत समिती, जिल्हा परिषद, ग्राम पंचायती आणि महापालिकांच्या निवडणुका आधी या प्रक्रियेत सुधारणा आवश्यक आहेत. न्यायालयाने पारदर्शकता सुनिश्चित करण्याचा प्रयत्न केला आहे. २० डिसेंबरच्या मतदानानंतर अर्ध्या तासापर्यंत एक्झिट पोल प्रसिद्ध करण्यास बंदी आणि निकाल जाहीर होईपर्यंत आदर्श आचारसंहिता लागू राहणे हे योग्य पाऊल असले तरी त्यात निवडणूक झाली तिथे मर्यादीत शिथीलताही हवी आहे. मात्र, हे तात्कालिक उपाय आहेत. मूळ समस्या मुदतीची आहे. सर्वोच्च न्यायालयाने ३१ जानेवारीची मुदत ठरवली असली तरी, ती वास्तववादी नाही. राज्यातील पावणे तीनशे नगरपालिका आणि नगरपंचायतींच्या निवडणुका उरकण्यात धन्यता मानणे हे चुकीचे आहे. प्रचाराला पुरेसा वेळ मिळत नसल्याने उमेदवार लोकांपर्यंत धोरणे पोहोचवू शकत नाहीत. परिणामी, पैसे वाटपाचे आरोप आणि टोकाचा संघर्ष वाढतो. ही स्थिती लोकशाहीसाठी हानिकारक आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने आपल्या आदेशात स्वयंस्फूर्त बदल करून मुदत वाढवावी. ३१ मार्च किंवा एप्रिल अखेरपर्यंत वेळ दिल्यास निवडणुका सुरळीत पार पडतील. प्रत्येक उमेदवाराला लढल्याचे समाधान मिळेल आणि लोकशाही मजबूत होईल. या प्रकरणातून एक धडा मिळतो: निवडणूक आयोगाने केवळ मुदत उरकण्यापेक्षा प्रक्रियेच्या गुणवत्तेवर लक्ष केंद्रित करावे. न्यायालयाचा हस्तक्षेप हे अव्यवस्थेचे लक्षण आहे. ती सुधारावी. राजकीय पक्षांनीही या मुद्यावर एकजूट दाखवावी. शेवटी, लोकशाही ही केवळ मतदान नाही, तर निष्पक्ष आणि पारदर्शक प्रक्रिया आहे. ती राखण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत.

# आहारच नव्हे तणावही मधुमेहाचे कारण – डॉ.जगदीश टेकाळे

बीड । प्रतिनिधी

मधुमेह हा आज सर्वात वेगाने वाढणारा आजार मानला जातो. केवळ मोठ्या शहरांतच नव्हे तर ग्रामीण भागातही मधुमेहाचे रुग्ण झपाट्याने वाढत आहेत. साइलेंट किलर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या आजाराने लाखो लोक त्रस्त आहेत. चुकीचा आहार, व्यायामाचा अभाव आणि असंतुलित जीवनशैलीसोबतच मानसिक ताणतणाव हाही एक गंभीर घटक आहे.



**तणावाचा शरीरावर परिणाम :**

मानसिक तणाव हा आजच्या वेगवान जीवनशैलीचा अविभाज्य भाग बनला आहे. कौटुंबिक अडचणी, नोकरीतील दबाव, आर्थिक ताण किंवा वैयक्तिक समस्या, या सर्व गोष्टींमुळे मनावर ताण येतो. तणावाच्या काळात शरीरात कोर्टिसोल नावाचे संप्रेरक मोठ्या प्रमाणात स्रवते. हे संप्रेरक इन्सुलिनच्या कार्यक्षमतेत अडथळा आणते. त्यामुळे रक्तातील ग्लुकोजची पातळी वाढते.

**तणावामुळे वाढणारा धोका:**

अनेक संशोधनांतून हे स्पष्ट झाले आहे की मानसिक ताण हा केवळ मनावरच नाही तर शरीरावरही परिणाम करतो. ताणतणाव दीर्घकाळ टिकला तर तो मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयविकार अशा गंभीर आजारांना आमंत्रण देतो. विशेषतः ज्या लोकांच्या कुटुंबात मधुमेहाचा इतिहास आहे, त्यांना तणावामुळे हा आजार लवकर होण्याची शक्यता जास्त असते.

**काय करावे ? :** मधुमेहावर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि तणाव टाळण्यासाठी जीवनशैलीत काही बदल करणे अत्यंत गरजेचे आहे.

**संतुलित आहार :** फायबरयुक्त अन्न, भाज्या, फळे, डाळी, संपूर्ण धान्य यांचा समावेश करावा. गोड, तळलेले आणि फॅटयुक्त पदार्थ शक्यतो टाळावेत. असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी.मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅर्डेलिस्ट)न्युरो सायक्यिाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले.

# दत्त जयंती निमित्त स्वामी समर्थ मंदिरात रक्तदान शिबिर



अंबड । प्रतिनिधी

श्री दत्त जयंती उत्सवा निमीत्त श्रीस्वामी समर्थ मंदीर अंबड येथे श्री गुरु चरित्र पारायण सप्ताह महा आरती प्राराळदान व भव्य रक्तदान शिबीर संपन्न झाले या मध्ये ३५ भाविकांनी रक्तदान केले १५० भाविकांनी गुरू चरित्र पारायण केले व २००० भाविकांनी दर्शनाचा व फराळाचा लाभ घेतला या मधील रक्त दाते अमोल लाहोटी, स्नेहा शिंदे, उदय वादे, दत्ता गरड, सौ. जयश्री गायकवाड, अर्जुन बाबर, सौ. पुजा तुपे, सौ. संगिता चव्हाण, श्रीराम मुळे, मोहन गोचरे, शरद पाटोळे, दिनेश काकडे, शंकर पाखरे, अदित्य कारके, भाऊसाहेब तौर, मदन खैरे, उर्मीला पाष्टे, ओमकार कान्हे, वैभव वानखेडे, श्रीकिसन जाधव, कृष्णा भिमराव राऊत, सुरभी पिंगळे, निळकंठेश्वर गायके, नरेंद्र बोबडे, संजय देशपांडे, महेश जामधडे, मयुर वाव्हळ, उध्दव कानडे, कृष्णा कापसे, अविनाश वैदय, प्रसाद श्रीधारा कापसे, अजित उढाण, दत्तात्र्य शिंगारे, विनोद शिंदे, सौ. जयश्री मुंदडा इत्यादी महिला व पुरुष सेवेकऱ्यांनी रक्तदान केले. हा कार्यक्रम यशस्वीते साठी मंदीराचे अध्यक्ष श्री सतिष सोडाणी, सचिव केदार मंत्री, व्यवस्थापक पंढरीनाथ जाधव, कर्मचारी पुरुषोत्तम ढोले, प्रदिप जिगे, सिध्देश्वर जाधव सेवेकरी मयुर वाव्हळ, हारणे साहेब, बबनराव चिंतामणी, प्रशांत खोमणे, भगवानराव शेंडगे, प्रसाद देशमुख, पांडुरंग गव्हाणे, संदीप आंधळे, गणेश सातपुते पृथ्वीराज शिंदे, प्रभात फेरी सत्संग मंडळ व अनेक महिला पुरूष सेवेकरी यांनी परिश्रम घेतले.

# राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त ग्राहकाची प्रलंबित प्रकरणे तात्काळ निकाली काढावीत – अनिल बोर्डे

गेवराई । प्रतिनिधी

राष्ट्रीय ग्राहक दिन २४ डिसेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात व तहसील कार्यालयात साजरा केला जातो. राष्ट्रीय ग्राहक दिना पर्यंत बीड जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची स्थापना करण्यात यावी अशी मागणी बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र जिल्हा उपाध्यक्ष अनिल बोर्डे यांनी मा. जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे प्रत्यक्ष निवेदन देऊन यासंबंधी चर्चा केलेली आहे.

जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्या माध्यमातून ग्राहकाच्या विविध खात्याच्या समस्या निराकरण करण्याचे काम तात्काळ केले जात होते. ग्राहक पंचायत महाराष्ट्र या संघटनेच्या माध्यमातून वारंवार पत्रव्यवहार करण्यात आला आहे परंतु त्याची दखल जिल्हाधिकारी कार्यालयाने अद्याप पर्यंत घेण्यात आलेली नाही. अद्याप पर्यंत ग्राहक संरक्षण परिषदेची स्थापना झालेली नाही. त्यामुळे ग्राहकाची कामे प्रलंबित राहत आहेत व त्यांना जलद गतीने न्याय मिळत नाही असे निर्दशनास आले आहे.ग्राहक पंचायत चे कार्यकर्ते अनेक वर्षापासून ग्राहक पंचायत कार्यकर्ते प्रबोधन व उदबोदन या क्षेत्रात कार्यरत आहेत. तरी निवेदनावर तात्काळ कार्यवाही करून ग्राहक संरक्षण परिषदेची स्थापना करण्याची मागणी केली आहे. सदरील प्रकरणाचा तात्काळ निपटारा करावा अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. राष्ट्रीय ग्राहक दिना अगोदर ग्राहक संरक्षण परिषदेची स्थापना करण्यात यावी. यावर तात्काळ विचारविनिमय होणे अत्यंत गरजेचे आहे.

तसेच राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त पर्यंत शेतकरी ग्राहकाची शेत रस्त्याची व इतर प्रलंबित फेरफार आदीची प्रकरणे प्रलंबित असल्याचे समजते त्यावर जलद गतीने निपटारा करणे आवश्यक आहे.केंद्र शासनाच्या ग्री ट्रॅक योजनेअंतर्गत प्रत्येक शेतकऱ्यांचा युनिक फार्मर आयडी( ओळखपत्र) असणे आवश्यक आहे. त्याशिवाय त्याशिवाय संबंधित शेतकऱ्यांना कोणतेही अनुदान मिळणार नाही. त्यासाठी ग्रामपंचायत व पोलीस पाटील व तलाठी कार्यालया मार्फत मोठ्या प्रमाणात जनजागृती करणे आवश्यक आहे. व्यापक ग्राहक जागृती शिवाय पर्याय नाही. तसेच जिल्ह्यातील शासकीय व निम शासकीय कार्यालयामध्ये कर्मचारी वर्ग व अधिकारी ओळखपत्राचा वापर करीत नसल्याचे निदर्शनास आलेले आहे .ओळखपत्र वापर न करणाऱ्या कर्मचाऱ्यावर तात्काळ शिस्तभंगाची कार्यवाही करणे आवश्यक आहे. ग्राहक हिताच्या दृष्टीने राष्ट्रीय ग्राहक दिना अगोदर सदरील काम पूर्ण करणे आवश्यक आहे .अशी मागणी बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र जिल्हा उपाध्यक्ष अनिल बोर्डे व गेवराई तालुका अध्यक्ष प्रा. भानुदास फलके व वडवणी तालुका अध्यक्ष शंकर झाडे आदींनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

## पान ६ वरून...

### परळी थर्मलच्या पाणी

शेतातील महानिर्मिती कंपनीची पाईपलाईन बुधवारी फुटल्याने लाखो लिटर पाणी वाहून शेतीच तीन डिसेंबर रोजी सकाळी नऊ वाजता अचानक फुटल्याने मोठ्या प्रमाणात पाणीसाठा बाहेर पडून परिसरातील शेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे.

गोदावरी नदी वरील खडका बंधाऱ्यावरून परळी येथील थर्मलला पाण्याचा पुरवठा केला जातो. ही पाईपलाईन खडका येथून आवलगाव मार्गे थर्मल ला जाते. सदरील पाईपलाईन फुटल्याने पाण्याचा प्रचंड वेग थेट शेजारील शेतांमध्ये घुसला. यामध्ये संबंधित शेतकऱ्याच्या शेतातील लागवड केलेला कांदा व हरभरा पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून मातीदेखील पाण्यासोबत वाहून गेली आहे. तसेच हे पाणी व्यंकटी तांड्यावरील घरात गेल्याने घरातील संसार उपयोगी साहित्य भिजून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तरी नुकसान भरपाई देण्याची मागणी करण्यात येत आहे.

### वैश्विक ओळखपत्र

शाळेतील सिंधू आसाराम वाटमोडे, पिठी शाळेतील प्रकाश बलभीम भोसले व कुसळंब शाळेतील सुनंदा धोंडीबा बहिर या चौदा सह शिक्षकांना मुख्य कार्यकारी अधिकारी जतिन रहमान यांनी एका आदेशाद्वारे निलंबित केले आहे. या चौदा शिक्षकांच्या निलंबनानंतर या निलंबन काळात त्यांनी पंचायत समिती या मुख्यालयाला हजेरी द्यायची आहे. कार्यालय प्रमुखाच्या परवानगीशिवाय मुख्यालय सोडता येणार नाही. या शिक्षकांना कुठलीही खाजगी नोकरी अथवा उद्योग करता येणार नाही. अशा प्रकारची अट घालून या सर्व शिक्षकांच्या सेवा पुस्तिकेत या आदेशाची नोंद घेण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी दिले आहेत. या आदेशाने जिल्हाभरातील बोगस अपंग शिक्षकांमध्ये खळबळ माजली आहे.

### गंगाई–बाबाजी राज्यस्तरीय

गोरगरिबांची मुले शिकली पाहिजेत. सुधारली पाहिजेत. संस्कारक्षम झाली पाहिजेत.या उदात्त भावनेने काही वर्षापूर्वी म.फुले, सावित्रीबाई फुले डॉ.बाबासाहेब आंबेडकर,राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्यासारख्या राष्ट्रपुरुष आणि समाज सुधारकांनी अतोनात प्रयत्न केले.त्याच शिक्षण क्रांतीच्या ज्योतीवर ज्योत पेटवण्याचे अमूल्य कार्य आष्टीसारख्या ग्रामीण भागामध्ये आष्टी,पाटोदा,शिरूर विधानसभा मतदार संघाचे माजी आमदार तथा शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष भीमराव धोंडे करत आहेत.यंदाचा हा गंगाई–बाबाजी कला महोत्सव २५ आहे.या महोत्सवाचे शानदार उद्घाटन होणार आहे. यावेळी उद्घाटन सोहळ्याचे अध्यक्षस्थानी माजी आ.भीमराव धोंडे हे उपस्थित राहणार आहेत.यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे सिनेट सदस्य युवा नेते अजयदादा धोंडे यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहेत.कला क्षेत्रातील विविध स्पर्धा गंगाई – बाबाजी कला महोत्सवा अंतर्गत भगवान महाविद्यालयाच्या भव्य मंचावर प्रचंड उत्साहात संपन्न होणार आहेत. या महोत्सवाचे यशस्वीतेसाठी भगवान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दत्तात्रय वाघ,उपप्राचार्य डा.आप्पासाहेब टाळके,प्रा.डा. ज्ञानदेव वैद्य,सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका, कर्मचारी हे परिश्रम घेत आहेत.

### सिद्धेश्वर संस्थानचे मठाधिपती

जोपसलेलं असलेलं नातं आज आसवाच्या रूपाने वाहत होतं.

हा निर्णय समजावून सांगण्यासाठी श्रीक्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती महंत नामदेव महाराज शास्त्री हे आज सायंकाळी चार वाजता सिद्धेश्वर संस्थान शिरूर येथे आले होते. शास्त्रीनी घेतलेला निर्णय आमच्या भावनांना दुःख देणार आहे. आमचे स्वामी आम्हालाच राहू द्या.. असे म्हणत आज सिद्धेश्वर संस्थान प्रांगणामध्ये महंत नामदेव शास्त्रींची विनंती करण्यासाठी हजारोच्या संख्येने गर्दी केली होती. आमच्या संस्थान महाराज स्वामी आम्हालाच राहू द्या असे जागोजागी फलक लावून लक्ष वेधी करण्याचाही प्रयत्न केला होता.

तर काहींनी चालू बैठकीमध्ये शास्त्रीना तशी विनंती ही करण्याचा प्रयत्न केला मात्र आपल्या निर्णयावर ठाम असलेले महंत नामदेव शास्त्री हा माझा निर्णय आहे आणि तो अंतिम आहे असे सांगून विवेकानंद शास्त्रींच्या प्रगतीसाठी शिरूरकरांना आडवे येऊ नका असे थेट सांगून टाकले आहे. यामुळे स्वामी विवेकानंद शास्त्री हे सिद्धेश्वर संस्थान वरून संन्यास घेणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. तर या ठिकाणी एक नवा कीर्तनकार व्यवस्थापक संस्थान कारभार पाहण्यासाठी नियुक्त केला जाणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

### उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे

छळ, तणाव आणि कौटुंबिक अत्याचारामुळे हा मृत्यू घडल्याची शक्यता आहे. त्यामुळे तपास दबावमुक्त, पारदर्शक आणि निष्पक्ष राहणे आवश्यक असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

डॉ. गोऱ्हे यांनी प्रकरणात स्वतंत्र उच्चस्तरीय विशेष चौकशी समिती (एसआयटी) नियुक्त करण्याची मागणी केली आहे. या समितीत वरिष्ठ पोलीस अधिकारी, महिला संवेदनशील संस्था, मनोवैज्ञानिक आणि कायदेतज्ज्ञांचा समावेश करावा अशी मागणी आहे. चौकशीत कोणताही राजकीय हस्तक्षेप होऊ नये, यासाठी स्पष्ट निर्देश द्यावेत, अशी विनंती करण्यात आली आहे. तसेच, पीडित कुटुंबावर कोणताही दबाव येऊ नये यासाठी विशेष संरक्षण, तातडीची कायदेशीर मदत, मानसिक समुपदेशन, तसेच गरजेनुसार आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्याची मागणी निवेदनात करण्यात आली.

प्रकरणाचा तपास कालबद्ध पद्धतीने, म्हणजे तीस दिवसांत प्राथमिक आणि दहा दिवसांत अंतिम अहवाल सादर करण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी सुद्धा करण्यात आली आहे. याशिवाय, महिलांच्या सुरक्षिततेसह मानसिक आरोग्याच्या दृष्टीने राज्यातील तरुण मुलींसाठी महाविद्यालयीन स्तरावर विवाहपूर्व समुपदेशनाची अनिवार्यता लागू करावी, व्यापक जनजागृती मोहीम राबवावी, प्रशिक्षित समुपदेशकांची नियुक्ती, गोपनीय तक्रार नोंद प्रणाली आणि भावनिक सक्षमीकरण सत्रे सुरु करावीत, अशा ठोस उपाययोजना सुचविण्यात आल्या आहेत. डॉ. गोऱ्हे यांनी स्पष्ट केले की, ''हा केवळ एका कुटुंबाचा शोक नाही, तर राज्यातील महिलांच्या सुरक्षिततेचा आणि न्यायव्यवस्थेवरील विश्वासाचा प्रश्न आहे. म्हणून त्वरित आणि ठोस कार्यवाही अत्यावश्यक आहे.''

### उस आंदोलनातील विजयी

राष्ट्रवादी शेरद पवार गट जिल्हा सरचिटणीस,युवा नेते बालासाहेब नाईकनवरे , प्रदिप घाटुळ उपसरपंच, नारायण भले सरपंच यांच्या उपस्थितीमुळे कार्यकर्त्यांना प्रेरणादायी ऊर्जा मिळणार आहे.आयोजनाची सूत्रे राजेश जाधव युवा जिल्हाध्यक्ष सुभाष कांबळेत तालुकाध्यक्ष,यांच्या देखरेखीखाली अंतिम टप्प्यात पोहोचली असून मैदानात तयारीचा जोर स्पष्ट जाणवत आहे.जिल्हाध्यक्ष नानासाहेब घोडके यांनी आवाहन करत म्हटले ''उस आंदोलनात युवांनी दाखवलेली जिद्द ही माजलगावची खरी ताकद आहे. हा सत्कार त्यांच्या लढ्याचा, त्यांच्या परिश्रमांचा सन्मान आहे. सर्व शेतकरी व समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे हि विनंती'' रविवारी, ७ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी एक वाजता, संत रविदास महाराज सभागृह, छत्रपती नगर, बायपास रोड, माजलगाव येथे हा भव्य सत्कार सोहळा होणार आहे

## पान १ वरून...

### वर्षभरात टोल बूथ प्रणाली

कार्यक्रम तयार केला आहे. हे संपूर्ण देशासाठी एकसमान आणि परस्परांशी जोडलेले इलेक्ट्रॉनिक टोल प्लॅटफॉर्म आहे. याचा उद्देश वेगवेगळ्या महामार्गांवरील वेगवेगळ्या प्रणालींची अडचण दूर करणे आणि एकाच तंत्रज्ञानाने सहजपणे टोल वसूल करणे हा आहे. या एनईटीसी प्रणालीचा मुख्य भाग फास्टॅग आहे, जो रेडिओ फ्रिक्वेन्सी आयडेंटिफिकेशन तंत्रज्ञानावर आधारित टॅग असतो आणि तो वाहनाच्या पुढील काचेवर (विंडस्क्रीन) चिकटवला जातो. वाहन टोल लेनमधून जाताच, सेन्सर हा टॅग वाचून वापरकर्त्याच्या लिंक केलेल्या बँक खात्यातून किंवा वॉलेटमधून टोल आपोआप कापून घेतात.

### भाजप राष्ट्रीय

निवडणुकाही नजीकच्या काळात होऊ शकतात. संतोष यांनी नुकतेच लखनऊत उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यासह राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मोजक्या नेत्यांसोबत चर्चा केली. उत्तर प्रदेशातील संघटनात्मक निवडणुका लांबणे हे राष्ट्रीय भाजप अध्यक्षांच्या निवडीतील विलंबाचे एक कारण मानले जाते. त्या राज्यातील कोणताही निर्णय भाजपला आदित्यनाथ यांच्याशी चर्चा केल्याशिवाय शक्य नसल्याचे सांगितले जाते. संसदेत पार पडलेली भाजपची उच्च स्तरीय बैठक पक्षाच्या भविष्यातील रणनीती आणि संघटनात्मक फेरबदलावर केंद्रित होती, असे सूत्रांनी सांगितले.आगामी संघटनात्मक निवडणुका आणि भविष्यातील विधानसभा निवडणुकांची भाजपची तयारी पाहता, सरकार व सत्तारूढ पक्षाचे सर्वेसर्वा नेतृत्व लवकरच नवीन अध्यक्षाचे नाव अंतिम करू शकते. अर्थात, हा निर्णय पक्षाच्या सर्वोच्च पातळीवर घेतला जाईल आणि त्याचा थेट परिणाम भाजपच्या राष्ट्रीय आणि प्रादेशिक राजकारणावर होईल हे स्पष्ट आहे.

### राज्यातील राजभवनाचे

तीर्थ हे नाव देण्यात आले आहे. नव्या परिसराला आधी सेंट्रल व्हिस्टा रीडेव्हलपमेंट प्रोजेक्टअंतर्गत एग्जिक्युटिव्ह एनक्लोव्ह म्हणून ओळखले जात होते. एग्जिक्युटिव्ह एन्क्लेव्हमध्ये पीएमओ व्यतिरिक्त कॅबिनेट सचिवालय, नॅशनल सिक्युरिटी कौन्सिल सचिवालय आणि इंडिया हाऊसची कार्यालये असणार आहेत. इंडिया हाऊस ही परदेशी उच्चस्तरीय प्रतिनिधींशी चर्चेसाठी तयार करण्यात आलेली विशेष जागा असेल. सेवा तीर्थ हे वर्कप्लेस सेवा, राष्ट्रीय ध्येय आणि जबाबदारीचे प्रतीक म्हणून डिझाइन करण्यात आले आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी सत्तेत आल्यानंतर शासकीय इमारतींची प्रतिमा बदलण्याचा प्रयत्न सातत्याने सुरू आहे. अधिका–यांच्या म्हणण्यानुसार हे फक्त नामांतर नसून सार्वजनिक पदांची भावना पुनर्परिभाषित करण्याचा मोठा उपक्रम आहे. सरकारच्या म्हणण्यानुसार हे बदल प्रतिमा नव्हे, तर शासनाच्या विचारसरणीत होणा–या परिवर्तनाचे प्रतीक आहेत. म्हणजेच सत्ता आणि नियंत्रणाच्या जुन्या चिन्हांऐवजी सेवा, कर्तव्य आणि जवाबदारी यांना केंद्रस्थानी आणण्याचा प्रयत्न आहे, असे सांगण्यात आले आहे.या बदलांची सुरुवात २०१६ मध्ये झाली. जेव्हा पंतप्रधान मोदी यांनी आपल्या निवासस्थानाचे नाव '७ रेस कोर्स रोड' वरून बदलून ७ लोक कल्याण मार्ग असे ठेवले. त्यानंतर २०२२ मध्ये राजपथचे नाव बदलून 'कर्तव्य पथ' करण्यात आले. आता भारताच्या प्रशासनिक केंद्रातही मोठा बदल झाला असून सेंट्रल सेक्रेटेरिएटच्या जागी 'कर्तव्य भवन' अस्तित्वात आले आहे.

### आज व्यापाऱ्यांचा

सुधारणा करण्यासाठी पुढील उपाय सुचवले आहेत, बाजार आवारात गोदाम आणि शीतगृह उभारणे, कीटकनाशक अवशेष तपासणीसाठी अत्याधुनिक प्रयोगशाळा सुरू करणे, शेतकऱ्यांना निर्यात प्रशिक्षण, पॅकिंग व दर्जा मार्गदर्शन करणे, नाशवंत मालासाठी तातडीची साठवणूक व्यवस्था उभारणे, प्रक्रिया उद्योगांना मालाच्या आवक–जावकविषयी नियमित माहिती देणे.

### भीमा कोरेगाव हिंसाचार

वर्षांहून अधिक काळ तुरुंगात असल्याने न्यायमूर्ती ए.एस. गडकरी आणि न्यायमूर्ती रणजितसिंह आर. भोसले यांच्या खंडपीठाने यास नकार देत बाबू यांना जामीन मंजूर केला.

हॅनी बाबू यांना २८ जुलै २०२० रोजी अटक करण्यात आली होती. त्यांच्यावर कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (माओवादी) चे सदस्य असणे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर हल्ला करण्याच्या कथित कटात सामील असल्याचा आरोप आहे.माओवादी संबंधांवरून जन्मठेपेची शिक्षा झालेले जी. एन. साईबाबा या सहकारी शिक्षणतज्ज्ञांना पाठिंबा देणाऱ्या समितीचे सदस्य असल्याचा आरोपही त्यांच्यावर होता. फेब्रुवारी २०२२ मध्ये सत्र न्यायालयाने बाबू आणि इतर तिघांचा जामीन अर्ज फेटाळला होता.सप्टेंबर २०२२ मध्ये, मुंबई उच्च न्यायालयाने ट्रायल कोर्टाचा निर्णय कायम ठेवला.बाबू यांनी या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. या वर्षी जानेवारीमध्ये सर्वोच्च न्यायालयाने कडून जामीन अर्जावर उत्तर मागितले होते.तथापि, या वर्षी मे महिन्यात, परिस्थितीत बदल झाल्याचे कारण देत बाबू यांनी सर्वोच्च न्यायालयातून आपला जामीन अर्ज मागे घेतला आणि मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

### सरकार आम्हाला

मात्र आता अशी परिस्थिती नाहीये. ज्यावेळी मी परदेशात भेट देतो. त्यावेळी सरकार त्या देशातील उच्चपदस्थांना लोकसभेच्या विरोधीपक्षनेत्याला न भेटण्याचा सल्ला देतात. लोकं आम्हाला सांगतात की तुम्हाला भेटू नका असा सल्ला देण्यात आला आहे. राहुल गांधी पुढे म्हणाले, लोकसभा विरोधीपक्षनेता हा दुसरा दृष्टीकोण देत

असतो. आम्ही देखील भारताचे प्रतिनिधित्व करतो. मात्र सरकारला आम्ही विदेशी उच्च पदस्थांना भेटू नये असे वाटते. असुरक्षितता वाटते म्हणूनच पंतप्रधान मोदी आणि परराष्ट्र मंत्रालय जुनी परंपरा पाळत नाहीत. दरम्यान, काँग्रेसचे खासदार शशी थरूर यांनी राहुल गांधी यांच्या या वक्तव्याचे समर्थन केले. त्यांनी लोकशाहीमध्ये इतर देशांच्या नेत्यांना कोणत्याही बाजूच्या नेत्यांना भेटण्याचे स्वातंत्र्य असावे असे सांगितले. काँग्रेसच्या खासदार प्रियांका गांधी यांनी देखील राहुल गांधी यांच्या या वक्तव्यावर प्रतिक्रिया दिली. त्या म्हणाल्या, हे खूप विचित्र आहे. दौऱ्यावर येणारे इतर देशांचे नेते हे विराधीपक्षनेत्यांना भेटतात हा प्रोटोकॉल आहे. मात्र हा प्रोटोकॉल सरकार पाळत नाही. त्यांची सर्व धोरणे याच तत्वावर आधारित आहेत. त्यांना कोणीही त्यांच्या विरूद्ध बोलू नये असे वाटते. ते इतर विरोधी पक्षाचे ऐकून घेत नाहीत. ते लोकशाहीच्या काही संकेतांना बांधील आहेत. ते कशाला घाबरतात देवालाच माहिती. लोकशाहीत प्रत्येकाला त्यांचे मत मांडण्याचा अधिकार असतो. चर्चा होते. त्यानंतरच योग्य ती कार्यवाही केली जाते. मात्र हे सरकार घाबरते. त्यांचे निर्णय त्याचेच प्रतिबिंब आहे. असे प्रोटोकॉल ब्रेक करून त्यांना काय मिळणार आहे. जगात आपल्या लोकशाही देशाच्या प्रतिमेला तडे जात आहेत, असे त्या म्हणाल्या.

### जय पवारांच्या लग्नाला

यांनीही जय पवार यांच्या लग्नाला जाण्यास नकार दिल्याची माहिती आहे. यासंबंधीच्या माहितीनुसार, अजित पवारांचे सुपुत्र जय पवार व ऋतुजा पाटील यांचे बहरीनमध्ये लग्न होत आहे. लग्नाचे विधी ४ डिसेंबरपासून ७ दिवस म्हणजे सलग ४ दिवस चालणार आहेत. हा शाही लग्नसोहळा बहरीन येथे होणार आहे. संसदीय अधिवेशनामुळे सुप्रिया सुळेही जय पवारांच्या लग्नाला जाण्याची शक्यता नाही. शरद पवार लांबचा प्रवास करत नाहीत. त्यामुळे ते ही या लग्नापासून दूर राहतील. त्यांच्या पत्नी प्रतिभा पवारही या लग्नाला जाणार नाहीत. फक्त रेवती सुळे (सुप्रियांच्या कन्या) या लग्नाला जातील.

### मुख्यमंत्री म्हणाले शेतकरी

असा सवाल देखील सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांना विचारण्यात आला. यावेळी ते म्हणाले की, आकडे काढावे लागतील.

३१ जूनआधी कर्जमाफी झाल्याशिवाय राहणार नाही. यावर्षीचे कर्जबाजारी शेतकरीही या कर्जमाफीत बसले आहेत. एकनाथ शिंदे, अजित पवार यांनी शब्द दिला आहे. दिलेला शब्द पाळला नाही, दगाफटका केला तर फासावर जाण्याची तयारी आहे'', असंही रोखठोक मत बच्चू कडूंनी यावेळी व्यक्त केलं आहे.

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शुक्रवार दि.५ डिसेंबर २०२५



## संकष्ट चतुर्थीच्या निमित्ताने कुंबेफळ येथे किर्तन

केज । प्रतिनिधी

कुंबेफळ ता. केज येथे संकष्टी चतुर्थी च्या निमित्ताने सुरवसे कुंटुबाच्या वतीने भागवताचार्य ह. भ. प रुपालीताई सवने यांचे किर्तन आयोजित करण्यात आले आहे. रुपालीताई सवने या महाराष्ट्रातील प्रतिथयश भागवताचार्य व किर्तनकार आहेत. झी टॉकीज



वर सतत त्या धार्मिक कार्यक्रम मध्ये सहभागी असतात. कुंबेफळ येथे दि. ७ डिसेंबर संकष्ट चतुर्थी दिवशी सांयकाळी ७ ते ९ असे सिद्धीविनायक गणेश मंदिरात किर्तन होईल व नंतर महाप्रसाद. या किर्तन सोहळ्याचा भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन दिलीप सुरवसे, वसंत सुरवसे व शरद सुरवसे कुंटुबाच्या वतीने करण्यात आले आहे.

# उसदर आंदोलनात किसानसभेची भूमिका महत्वाची ठरली - कॉ. मुसद्दीक बाबा

माजलगाव। प्रतिनिधी

माळेवाडी जवळच्या एका गूळ युनिट पासून सुरु झालेले ऊस दर आंदोलन तालुक्यातील सर्व ३ साखर कारखान्यापर्यंत पेटत गेले आणि त्याचा आंबट गोड शेवट झाला व उसाला प्रति टन पहिला हफ्ता रु २७७५ देण्याच्या अटीवर हे आंदोलन सध्या तरी स्थगित झाले आहे. कारखानदार व आंदोलक यांनी सामंजस्याची भूमिका घेतल्याने तालुक्यातील ३५ लाख टन उसाचा प्रश्न मार्गी लागला त्याच बरोबर या आंदोलनाने ऊस तोड कामगार ऊस वाहतूकदार यांची होणारी कोंडी सुटली.

शेतकऱ्यांच्या पोरांनी युवा शेतकरी संघर्ष समितीच्या माध्यमातून सुरु केलेल्या या आंदोलनात इतर पक्ष व शेतकरी संघटना बरोबरच किसान सभा सक्रिय पणे सहभागी झाली होती ऊस बागायतदार शेतकरी ऊस तोड कामगार व ऊस वाहतूकदार यांच्या बरोबर सामंजस्य भूमिका घेऊन कारखानदारांची कोंडी



करण्यात आंदोलक यशस्वी झाले सुरवातीला जेव्हा गूळ युनिटवाले २२०० रु प्रतिटन तर कारखानदार २४०० रु प्रतिटन भाव मिळेल अशी चर्चा करून शेतकऱ्यांना अस्वस्थ करत होते उसाला कारखाना किती भाव देईल हे पण कारखानदार बोलत नव्हते म्हणून त्यामुळे तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये संशयाचे वातावरण निर्माण झाले व बघता बघता माळेवाडी च्या एका गूळ युनिट पासून सुरु झालेले हे आंदोलन जिल्हाभर पसरले शेवटच्या टप्प्यात तर या आंदोलनाचे लोन परभणी जिल्ह्यात पाथरी सोनपेठ पर्यंत पोहचले. शेतकऱ्यांच्या पोरांनी सुरु केलेल्या आंदोलनाला दिशा व ऊर्जा देण्याचे काम युवा शेतकरी संघर्ष समिती बरोबरच किसानसभेच्या राज्य पातळीवरील नेत्यांनी केले.यात राज्य सचिव कॉ.अजित नवले राज्य अध्यक्ष उमेश देशमुख कॉ.अजय बुरांडे यांनी या आंदोलनात उतरून आंदोलन तेवत ठेवले तसेच कारखानदाराबरोबर यशस्वी चर्चा सर्वमान्य तोडगा काढत ₹२७७५ पर्यंत प्रति टन पहिला हफ्ता देण्याची मागणी मान्य करून घेतली चर्चेत संघर्ष समितीतील जगदीश फरताडे अजय राऊत कॉ.मोहन जाधव इत्यादी सहभागी होते. शेतकऱ्यांच्या पदरात झुकते माप टाकत सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखाना व जयमहेश कारखाना रु २७७५ प्रति टन पहिला हफ्ता तर छत्रपती सह साखर कारखान्याने ₹२७५० प्रति टन पहिला हफ्ता देण्याचे मान्य केले आहे त्या अगोदर बजरंग सोनवणे यांनी २८०० रु प्रतिटन पहिला हफ्ता देऊन अंतिम भाव ३००० रु देण्याचे जाहीर केल्याने या आंदोलनाचे हे मोठे यश समजावे लागेल. शेतकऱ्यांची पोरं संघटित झाली आणि ऊस दरवाढीचे आंदोलन तीव्र करून कारखानदारांचे नाक तोंड दाबल्याने हे आंदोलन यशस्वी झाले आपल्या हक्कासाठी शेतकरी जागा होऊन संघटित झाला तर इथून पुढे कारखानदार उसाला योग्य भाव देण्यास बांधील होतील हे या आंदोलनाचे मोठे यश असल्याचे कॉ.मुसद्दीक बाबा यांनी सांगितले.

## गँगरेप प्रकरणी आरोपींचा जामीन नामंजूर

बीड। प्रतिनिधी

भैरोबा वस्ती परिसरातील सामूहिक बलात्कार प्रकरणातील आरोपींचा जामीन अर्ज जिल्हा न्यायालयाने नामंजूर केला आहे. फिर्यादीच्या वतीने ॲड. तेजेस एस. नेहरकर यांनी प्रभावी युक्तिवाद करत आरोपींच्या बाजूतील विसंगती व पुराव्यांतील तफावत न्यायालयाच्या निदर्शनास आणल्याने हा महत्त्वपूर्ण निर्णय देण्यात आल्याची माहिती मिळाली आहे.



या बाबत अधिक माहिती अशी की, दिनांक १३/११/२०२५ रोजी फिर्यादी भैरोबा वस्ती येथुन नांदमाळावर गेली असता आरोपीने फिर्यादीस कागदपत्र घेवुन या अशा बहाण्याने बोलवुन घेतले. त्यानंतर संगनमत करून आरोपींनी फिर्यादीला स्कुटीवरून परत येत असताना कोंबडीपालनाच्या शेडजवळ अडवून तिच्यावर सामूहिक बलात्कार केला. फिर्यादीने घडलेल्या अत्याचाराची माहिती नातेवाईकांना दिली. त्यानंतर फिर्यादीला तात्काळ मिरजगाव येथील दवाखाण्यात नेण्यात आले व त्यानंतर पुढील उपचारासाठी अहिल्यानगर येथे हलवण्यात आले. या प्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरून आष्टी पोलिस ठाण्यात आरोपी बाळू अप्पासाहेब काळे, अप्पासाहेब बापुराव काळे, अजिनाथ बापुराव काळे, श्याम उर्फ श्यामराजे अजिनाथ काळे (सर्व रा. ता. आष्टी, जि. बीड) यांच्या विरोधात गु.र.नं. ५२९/२०२५ अंतर्गत भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ७०(१) व ३(५) प्रमाणे १५ नोव्हेंबर २०२५ रोजी गुन्हा नोंदविण्यात आला. त्या नंतर आरोपींनी फौजदारी जामिनासाठी अर्ज क्र. ११६१/२०२५ जिल्हा न्यायाधीशांकडे दाखल केला होता. या सुनावणीत फिर्यादीच्या वतीने ॲड. तेजेस नेहरकर यांनी आरोपींच्या बचावातील मुद्दे अपुरे व अविश्वसनीय असल्याचे न्यायालयासमोर मांडले. घटनास्थळ, वैद्यकीय पुरावे, तसेच फिर्यादीचे जबाब यावर आधारित मांडलेल्या युक्तिवादाला न्यायालयाने मान्यता दिली. न्यायालयाने सर्व पुरावे आणि परिस्थितीचा विचार करून आरोपींचा जामीन अर्ज नामंजूर केला. या प्रकरणात ॲड. नेहरकर यांना ॲड. गौतम जी. नाईकवाडे व ॲड. सिंकदर इस्लाम शेख यांनी सहकार्य केले.

## पाटोदा पीडब्ल्युडी कार्यालयातील अधिकारी कर्मचाऱ्यांची अनुपस्थिती

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची वेळेवर कार्यालयात अनुपस्थिती आणि ढिसाळ कामकाजामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. वेळेवर हजेरी नसणे, फाईली अडकवणे, कामात होणारी दिरंगाई आणि जबाबदारीचा अभाव या सर्व प्रकारांमुळे सर्वसामान्य नागरिकांच्या कामात सतत अडथळे निर्माण होत असून असंतोष वाढत आहे. नागरिकांचे म्हणणे आहे की, कार्यालयात एखादे काम घेऊन गेल्यास तासन्तास प्रतीक्षा करावी लागते. अनेकदा अधिकारी व संबंधित कर्मचारी वेळेवर कार्यालयात हजर नसल्याने नागरिकांना पुन्हा पुन्हा चकरा माराव्या लागतात.

अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे संतप्त झालेल्या नागरिकांनी एक अनोखा उपक्रम हाती घेतला आहे. पाटोदा कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी वेळेवर कार्यालयात येतात, याचे पुरावे द्या आणि बक्षीस मिळवा'', अशी घोषणा करण्यात आली असून या घोषणेमुळे विभागातील शिस्तभंगाचा मुद्दा चर्चेत आला आहे.

या उपक्रमामुळे कार्यालयातील उपस्थितीचा विषय अधिक गंभीर स्वरूप धारण करत असून नागरिकांच्या नाराजीला छेद मिळाला आहे. कार्यालयातील सीसीटीव्ही फुटेज तपासून संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांची उपस्थिती स्पष्ट होऊ शकते, त्यामुळे तातडीने फुटेज तपासावे आणि दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी नागरिकांची मागणी आहे. अन्यथा पुढील काळात तीव्र आंदोलन उभे करण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे. पाटोद्यातील कार्यालयातील अनियमितता, शिस्तहीनता आणि दिरंगाई यामुळे नागरिकांचे हाल होत असून हा विषय संपूर्ण तालुक्यात चर्चेचा केंद्रबिंदू बनला आहे. नागरिकांचे म्हणणे आहे की ''लोकांचे काम तातडीचे असताना अधिकारी वेळेवर येत नाहीत, हे सार्वजनिक सेवेचे उल्लंघन आहे. प्रशासनाने यामध्ये हस्तक्षेप करून तातडीने शिस्त प्रस्थापित करावी. नागरिकांच्या नाराजीमुळे आता विभागावर दबाव वाढला असून पुढील काही दिवसांत प्रशासन कोणती भूमिका घेते, याकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीचे अनुदान नाही, पाटोदा तहसिलचा भोंगळ कारभार ?

पाटोदा। प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यात दिनांक २१/९/२०२५ रात्री व २३/९/२०२५ रोजी अतिवृष्टी झाली.अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी खरडुन वाहुन गेल्या, विहीरी वाहुन गेल्या, विहीरी बुजल्या अनेक शेतकऱ्यांचे जनावरे वाहुन गेले व अनेक शेतकऱ्यांचे तसेच गरीबांचे घरे पडली,भिंती पडल्या होत्या.आता जवळपास अडीच महिने होत आले आहेत तरी अद्याप पर्यंत बहुतांश शेतकऱ्यांना व इतर सामान्य जनतेला पाटोदा तहसिलच्या दिरंगाई मुळे व पाटोदा तहसिलच्या भोंगळ व कासवगतीने चाललेल्या कारभारामुळे याचे अनुदान अद्याप पर्यंत भेटले नसुन शेतकरी व नागरिक तलाठी कार्यालयात व तहसिल मध्ये खेट्या घालून घालून परेशान आहेत परंतु पाटोदा तहसिलला याचे काहिही सोयर सुतक नसुन शेतकरी राजा मात्र वाऱ्यावर आहे. बीडचे कर्तव्य दक्ष जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन साहेब यांनी तात्काळ चौकशी करून शेतकऱ्यांचे खरडुन गेलेल्या जमीनीचे, वाहुन गेलेल्या विहीरीचे, बुजलेल्या विहिरीचे, शेतकऱ्यांच्या वाहुन गेलेल्या जनावरांचे, पडझडीचे व इतर राहीलेले अनुदान त्वरित वाटप करण्याचे संबंधितांना आदेश द्यावेत व अडीच महिने होवुन गेले अद्याप पर्यंत अनुदान का वाटप केले नाही अशा निष्क्रिय तहसिलदार यांचेवर निलंबनाची कारवाई करण्यात यावी अशी मागणी जनतेतुन व शेतकरी वर्गातुन होत आहे.

- ग्राम महसूल अधिकाऱ्याने अनुदान वाटपाच्या यादीतील घोळ तात्काळ दूर करून अचूक यादी अंतिम करावी अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. यादीत वारंवार 'तेच तेच' नावे येत आहेत, ज्यामुळे शेतकऱ्यांना अनुदान मिळण्यात अडचणी निर्माण होत आहेत. कागदपत्रांची पूर्तता करून खरडुन गेलेली जमीन, बुजून गेलेली विहीर, घराची झालेली परझड यासाठी अनुदान वितरण करण्यात वेळ काढू नये अशी मागणी करण्यात येत आहे. पशुधन नुकसान भरपाई आणि खरडुन गेलेल्या जमिनीची याद्या अंतिम करण्यासाठी आवश्यक असलेली कागदपत्रे आणि बँक तपशील तपासण्याचे काम तात्काळ पूर्ण करावे. ग्राम महसूल अधिकाऱ्यांनी निधी वर्ग होण्याची वाट न पाहता, सर्व याद्या आणि वितरणाची प्रक्रिया तात्काळ पूर्ण करावी. तातडीच्या कार्यवाहीसाठी अंतिम मागणी करण्यात येत आहे. वरिष्ठ स्तरावर तातडीने पत्रव्यवहार करून प्रलंबित असलेला सर्व अनुदान व घरडुन गेलेल्या जमीन, घरात पाणी जाउन उद्वस्त झालेले नागरिकाना पथझड झाल्याचा निधी त्वरित वर्ग करण्याची क्रुपा करावी. अनुदान वाटपाच्या यादीतील घोळ दुरुस्त करावा कागदपत्रांची पूर्तता करून अनुदान वितरण करण्यात वेळ काढू नये पशुधन नुकसान भरपाई आणि खरडुन गेलेल्या जमिनीची याद्या अंतिम कराव्यात निधी वर्ग होण्याची वाट न पाहता, सर्व याद्या आणि वितरणाची प्रक्रिया तात्काळ पूर्ण करावी

## जिजाऊ महाविद्यालयाची जागतिक एड्स दिनानिमित्त रॅली

किल्लेधारूर। प्रतिनिधी

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये धारूर ग्रामीण रुग्णालय, आयुष नर्सिंग कॉलेज, ग्रामीण विकास मंडळ बनसारोळा,राष्ट्रीय सेवा योजना विभाग, कमवा व शिका योजना, रेड रिबन क्लब, राष्ट्रीय छात्र सेना व एकात्मिक सल्ला व चाचणी केंद्र ग्रामीण रुग्णालय धारूर यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ४ डिसेंबर रोजी जागतिक एड्स दिनानिमित्ताने धारूर शहरामध्ये एड्स विषयक जनजागृतीपर रॅली काढण्यात आली. वैद्यकीय रुग्णालयातील डॉ. शहाजी लोमटे यांनी रॅलीमध्ये सहभागी विद्यार्थी स्वयंसेवकांना मार्गदर्शन करताना एचआयव्ही विषाणू व बाधित



असल्यास घ्यावयाची काळजी या विषयी सखोल व सविस्तर माहिती दिली. या रॅलीचे उद्घाटन तालुका वैद्यकीय अधीक्षक डॉ. शशांक वाघमारे यांनी रॅलीस हिरवा ध्वज दाखवून रॅलीस सुरुवात झाली. रॅलीत सहभागी विद्यार्थी, एनएसएस स्वयंसेवक, एनसीसी कॅडेट्स यांनी रॅली मधून विविध प्रकारच्या घोषणा देऊन धारूर शहरातील नागरिक व ग्रामस्थांमध्ये एड्स विषयक जनजागृती घडविली. विद्यार्थी व विद्यार्थिनींनी विविध प्रकारचे घोषवाक्य लिहिलेल्या पोस्टरच्या माध्यमातून घोषणा देत जनतेमध्ये एड्स विषयी जनजागृतीचे संदेश दिले. रॅलीमध्ये सहभागी झालेल्या सर्व एनएसएस स्वयंसेवक, एनसीसी कॅडेट्स व विद्यार्थ्यांना अल्पोपहार देऊन रॅलीची सांगता झाली. या रॅलीमध्ये डॉ. मुंडे गौरव, शैलेश लोंढे, प्रेमानंद स्वामी, राजेश जाधव, श्री डी व्ही तिवारी,वाल्मीक पाईक, श्री. डावरे, श्री. अश्विन कुमार, शितल वड्डे, किशकिंदा पांचाळ, छाया चोपडे, आयुष नर्सिंग कॉलेजचे गणेश निर्मळ, माया निर्मळ, वंदना निंगुळे, प्रतिक डोईफोडे, शितल शेटे, केशरबाई नर्सिंग कॉलेजचे राम सरवदे महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. बालासाहेब जोगदंड, महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्रीकृष्ण मंदिरात दत्तजयंती मोठ्या उत्साहात साजरी

लिंबागणेश। प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील प्रसिद्ध श्रीकृष्ण मंदिरात आज दि.०४ गुरुवार रोजी १२८ वी दत्त जयंती अत्यंत भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. मंदिर परिसर विद्युत रोषणाईने उजळून निघाला होता तर फुलांच्या आकर्षक सजावटीमुळे संपूर्ण मंदिराला वेगळाच दिव्य आणि मंगलमय असा नजार मिळत होता. दत्त जयंतीनिमित्त अभिषेक, महापूजा, आरती, दत्तयाग यांसह भजन, कीर्तन, प्रवचन, व्याख्यान अशा विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दत्त गुरूच्या जयघोषांनी संपूर्ण मंदिर परिसर दुमदुमून गेला. मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थित राहून दर्शन घेतले. कार्यक्रमानंतर भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.



हिंदू धर्मात दत्त जयंतीला विशेष महत्व आहे. मार्गशीर्ष महिन्यातील पौर्णिमेच्या दिवशी भगवान दत्तात्रेयांचा जन्म झाल्यामुळे दरवर्षी हा दिवस मोठ्या भक्तिभावाने साजरा केला जातो. ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांच्या संयुक्त अवतार म्हणून दत्तात्रेयांचे वर्णन धर्मग्रंथांत आढळते. गुरुपरंपरेला मानणाऱ्या भाविकांसाठी दत्तात्रेयांची पूजा केल्याने त्रिमूर्तीची पूजा केल्याइतके पुण्य प्राप्त होते, असे मानले जाते. या दिवशी भक्तीपूर्ण उपासना केल्याने घरात सकारात्मक ऊर्जा निर्माण होते आणि वातावरण शांती, सौभाग्याने परिपूर्ण होते, अशी श्रद्धा आहे. दत्त जन्मोत्सव सोहळ्याच्या मुख्य कार्यक्रमात किर्तनकारांनी भावस्पर्शी कीर्तन, भक्तिमय गाणी आणि दत्त तत्त्वज्ञानावरील मार्गदर्शन करून वातावरण अधिक पवित्र आणि आध्यात्मिक केले. उपस्थित भाविकांनी या भव्य आणि भक्तिरसपूर्ण सोहळ्याचा मनसोक्त लाभ घेतला.

## बीडमध्ये 'हमारा शौचालय हमारा भविष्य' मोहीम कागदावरच?

### शाळेसाठी ग्रामस्थांनी ६ गुंठे जमीन, लोकवर्गणीतून रंगरंगोटी लाईटफिटींग

बीड। प्रतिनिधी

केंद्र आणि राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जागतिक शौचालय दिनानिमित्त १९ नोव्हेंबर ते १० डिसेंबर या कालावधीत 'हमारा शौचालय, हमारा भविष्य' ही विशेष मोहीम राज्यभर राबविण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या उपक्रमाअंतर्गत जिल्ह्यातील सर्व १३५६ गावांतील वैयक्तिक व सार्वजनिक शौचालयांची तपासणी, दुरुस्ती, रंगरंगोटी करून ती वापरात आणण्याचे निर्देश विभागाकडून देण्यात आले आहेत. आरोग्य, शिक्षण, महिला व बालकल्याण आणि उमेद विभागांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहन जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी केले आहे. मात्र, ही मोहीम प्रत्यक्षात कागदोपत्रीच राबविली जात असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते आणि जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे मुख्य प्रचार प्रमुख डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला आहे. ग्रामीण भागातील अनेक शाळा व अंगणवाड्यांमध्ये आजही शौचालयांचा अभाव असून, शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांना शारीरिक व



मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याची गंभीर नोंद त्यांनी निवेदनात केली आहे.

डॉ. ढवळे म्हणाले की, ''शौचालय ही केवळ सुविधा नसून आरोग्य, सुरक्षितता आणि प्रतिष्ठेशी निगडित मूलभूत गरज आहे. अनेक निवेदने व आंदोलने करूनही प्रशासन जागे नाही.त्यांनी ग्रामीण भागातील सर्व शाळा-अंगणवाड्यांमध्ये तातडीने शौचालयांची निर्मिती, अपूर्ण शौचालयांची दुरुस्ती आणि वापरासाठी सुसज्जता करण्याची मागणी केली आहे. यासंदर्भातील लेखी निवेदन महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, पालकमंत्री अजितदादा पवार आणि शिक्षणमंत्री दादा भुसे यांना जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेमार्फत पाठविण्यात आले आहे.

जिल्हा प्रशासनाच्या म्हणण्यानुसार १० डिसेंबर रोजी 'उत्कृष्ट शौचालय पुरस्कार' देण्यात येणार आहेत. मात्र, प्रत्यक्षात या मोहिमेची कोणतीही माहिती संबंधित शाळांना देण्यात आलेलीच नाही, असे चित्र दिसून येत आहे. लिंबागणेश केंद्रीय प्राथमिक शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक दिपक घाटे यांनी सांगितले की, ''मोहीमेसंदर्भात आम्हाला कोणतेही पत्र, आदेश किंवा सूचना मिळाल्या नाहीत.

यावर प्रतिक्रिया देताना डॉ. गणेश ढवळे म्हणाले, ''म्हणूनच स्पष्ट होते की मोहीम फक्त कागदावर आहे, जमिनीवर काहीच नाही.''६ गुंठे जमीन, ५० हजारांची लोकवर्गणी; तरीही स्वच्छतागृह नाही लिंबागणेश केंद्रीय जिल्हा परिषद अंतर्गत बेलगाव वस्ती शाळेची रंगरंगोटी व लाईटफिटींग ग्रामस्थांनी लोकवर्गणीतून केली आहे. या कामांसाठी जवळपास ५० हजार रुपये जमा करून खर्च करण्यात आला. शाळेसाठी ६ गुंठे जमीन स्वतःहून देण्यात आली. मात्र, शौचालयाची किमान सोयसुद्धा उपलब्ध करून देण्यास शासन अपयशी ठरत असल्याने पालकांत संताप व्याप्त आहे. आम्ही स्वतः पैसे जमवून शाळेला रंगरंगोटी केली, लाईटफिटींग केली. जमीनही दिली. निदान आमच्या लेकरांसाठी शासनाने एक तरी स्वच्छतागृह उभारावे.

## वीजपुरवठा विस्कळीत झाला तर महावितरणला जबाबदार धरु: मडके

गेवराई। प्रतिनिधी

तालुक्यातील नागरिकांना योग्य आणि सुरळीत वीजपुरवठा मिळावा यासाठी शिवसेना तालुकाप्रमुख उद्धव (बापू )मडके यांनी महावितरण विभागास अधिकृत निवेदन सादर करून तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. गेवराई शहर व उपखेरीजमधील गावांमध्ये होणाऱ्या सततच्या लोडशेडिंगसह अनियमित वीजपुरवठ्यामागील कारणांची संपूर्ण माहिती ऑन पेपर स्वरूपात सादर करण्याचा आदेश त्यांनी महावितरण अधिकाऱ्यांना दिला.



मडके यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की ''शासनाच्या नियमांनुसार नागरिकांना दर्जेदार वीजपुरवठा देणे ही महावितरणची कायदेशीर जबाबदारी आहे. अनियमितता सहन केली जाणार नाही. प्रत्येक फीडरनिहाय वीजपुरवठ्याचा तपशील, यंत्रसामग्रीची स्थिती, दुरुस्तीचे वेळापत्रक व अधिकारी-कर्मचारी यांची जबाबदारी महावितरणने तात्काळ स्पष्ट करावी. शिवसेना तालुकाप्रमुखांनी केलेल्या निवेदनात विशेषतः खालील माहिती मागवण्यात आली आहे गेवराई शहर व परिसरातील फीडरनिहाय वीजपुरवठ्याचा तपशील वीजपुरवठ्यातील बिघाड, कमकुवत लाईन, ट्रान्सफॉर्मर क्षमतेविषयी रिपोर्ट वीजपुरवठा खंडित होण्यामागील तांत्रिक/प्रशासकीय कारणांची अधिकृत माहिती

संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदाऱ्या स्पष्ट करणारा अहवाल तसेच, महावितरणने ही संपूर्ण माहिती लेखी स्वरूपात (ऑन पेपर) तात्काळ सादर करावी, अन्यथा शिवसेनेच्या वतीने तीव्र आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे. निवेदन स्वीकारताना उपविभागीय अभियंत्यांनी आवश्यक माहिती लवकरात लवकर उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. शहरातील वीजपुरवठ्याबाबत वाढत्या तक्रारी लक्षात घेता शिवसेनेने घेतलेली ही आक्रमक भूमिका सर्वसामान्य नागरिकांच्या हितासाठी महत्त्वाची ठरत आहे.

# मराठवाड्यात रब्बीसाठी मुबलक पाणीसाठा

## सर्व मिळून ९६ टक्के पाणी उपयुक्त

संभाजीनगर : मराठवाड्यातील मोठ्या, मध्यम, लघू प्रकल्पांसह नदीवरील बंधारे मिळून ८९० प्रकल्पांत आताच्या घडीला सुमारे ९६.९५ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे. त्यामुळे रब्बीसाठी सिंचनाच्या आशा उंचावल्या आहेत. मराठवाड्यातील ११ मोठ्या प्रकल्पांमध्ये ९८.८२ टक्के उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध आहे. त्या पाठोपाठ ७५ मध्यम प्रकल्पांत ९७. ४९ टक्के, ७५४ लघू प्रकल्पांत ९३.५८ टक्के, गोदावरी नदीवरील १५ बंधाऱ्यांमध्ये ८५.६४ टक्के, तर तेरणा, मांजरा व रेणा या तीन नद्यांवरील ३५ बंधाऱ्यांमध्ये सुमारे ८८.१४ टक्के उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध असल्याची माहिती जलसंपदा विभागाकडून देण्यात आली.

मराठवाडयातील एकूण ११ मोठ्या प्रकल्पांपैकी दहा मोठे प्रकल्प तुडुंब आहेत. यामध्ये जायकवाडी, येलदरी, सिद्धेश्वर, माजलगाव, उर्ध्व, पेनगंगा, मांजरा, निम्न तेरणा, निम्न मणार, विष्णुपुरी व सीना कोळेगाव आदी प्रकल्पांचा समावेश आहे.





केवळ निम्न दुधना प्रकल्पात ७५ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक असणे याला अपवाद आहे. जायकवाडी प्रकल्पाच्या दोन गेटमधून गोदापात्रात सुरू असलेला विसर्ग थांबविण्यात आला आहे. शिवाय प्रकल्पाच्या डाव्या कालव्यातून रब्बीच्या पहिल्या आवर्तनासाठी शंभर क्युसेकने विसर्ग सुरू करण्यात आला आहे. याबाबतच्या माहितीनुसार २५ नोव्हेंबर ते १० डिसेंबर या कालावधीत रब्बीसाठी पहिले आवर्तन सोडले जाणार होते. परंतु त्याला पाच दिवस विलंब होऊन १ डिसेंबरला पहिले आवर्तन डाव्या कालव्यातून सुरू करण्यात आले.

त्यामुळे पहिल्या आवर्तनाचा पाणी सोडण्याचा कालावधी पुढे वाढू शकतो. याशिवाय कालवा सल्लागार समितीच्या बैठकीनंतर रब्बीसाठी पुढील आवर्तने सोडण्याविषयी निर्णय होणार असल्याची माहिती सुत्रांनी दिली.

मराठवाड्यातील पंचाहत्तर मध्यम प्रकल्पांपैकी नांदेड, परभणी, बीड जिल्ह्यांतील मध्यम प्रकल्प तुडुंब आहेत. दुसरीकडे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील १६ मध्य प्रकल्पांत ९८ टक्के, जालना जिल्ह्यातील ७ मध्यम प्रकल्पांत ९६ टक्के, लातूरमधील ८ मध्यम प्रकल्पांत ८९ टक्के, धाराशिवमधील १७ मध्यम प्रकल्पांत ९९ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे.

# कांद्याचे भाव ५५ टक्क्यांनी वाढले



महाराष्ट्रातील कांदा उत्पादकांसाठी मोठी आनंदाची बातमी आहे. कांद्याच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. नाशिकमधील लासलगाव बाजार समितीत नवीन खरीप कांद्याच्या सरासरी घाऊक किमती वाढलेल्या पाहायला मिळत आहे. शनिवारी २००० रुपये प्रति क्विंटल असलेला कांदा सोमवारी ३,१०० रुपये प्रति क्विंटलवर पोहोचला. म्हणजे फक्त २ दिवसात कांद्याच्या किमतीत तब्बल ५० टक्क्यांपेक्षा जास्त वाढ झाली. कांद्याला चांगला भाव मिळत असल्याने कांदा उत्पादक शेतकऱ्याला दिलासा मिळाला आहे. तर दुसरीकडे सर्वसामान्य ग्राहकांच्या मात्र खिशाला आणखी चाप लागणार आहे.

लासलगाव एपीएमसीमध्ये सुमारे २,४०० क्विंटल नवीन खरीप कांद्याचा लिलाव करण्यात आला, ज्यामध्ये सर्वात कमी घाऊक किमत ५०० रुपये आणि सर्वाधिक ४,३०० रुपये प्रति क्विंटल होती. कांद्याच्या घाऊक किमतीत मोठी वाढ होण्याची अनेक कारणे आहेत. यातील महत्वाचे कारण म्हणजे बाजारात कांद्याच्या उपलब्धतेच्या तुलनेत मागणी जास्त वाढली. तसेच काही कंपन्या बियाणे उत्पादनासाठी कांदे खरेदी करत आहेत आणि मर्यादित पुरवठा असल्याने किमती वाढल्या आहेत. व्यापाऱ्यांच्या मते, कापणी नुकतीच सुरू झाली आहे, त्यामुळे पुरवठा कमी आहे आणि किमती वेगाने वाढत आहेत.

**१०,५४६ क्विंटल कांद्याचा लिलाव**

:

डिसेंबरच्या दुसऱ्या सहामाहीत नवीन खरीप कांद्याचा नियमित पुरवठा वाढण्याची अपेक्षा आहे. याउलट, मार्च-एप्रिलमध्ये काढणी केलेला उन्हाळी कांदा लासलगावमध्ये सरासरी फक्त १,१०० रुपये प्रति क्विंटलला विकला गेला. एका व्यापाऱ्याने सांगितले की उन्हाळी कांद्याचे किमान आणि कमाल घाऊक दर अनुक्रमे ३०० आणि १,७०१ प्रति क्विंटल होते.


# सोयाबीनला ८१५० रुपये विक्रमी भाव; शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान



नागपूर : नागपूर बाजार समितीत सोयाबीनला ८१५० रुपयांचा विक्रमी भाव मिळाला आहे. इतका मोठ्या प्रमाणात सोयाबीनला दर मिळाल्याने शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर एकप्रकारचे समाधानाचे वातावरण बघायला मिळाले. परंतु फक्त नागपूरमध्येच आठ हजाराच्या वर सोयाबीनला भाव मिळाला आहे. महाराष्ट्रातील इतर बाजार समित्यांमध्ये सोयाबीनला म्हणावा असा भाव नाही. ४००० ते ४५०० रुपये प्रति क्विंटल भावाने इतर बाजार समितीत सोयाबीनचा दर आहे. गेल्या महिन्यात, मुसळधार पाऊस आणि बाजारातील अनिश्चिततेमुळे सोयाबीनच्या भावात चढउतार बघायला मिळत आहेत.

३ डिसेंबर नोव्हेंबर २०२५ रोजी बघितले तर महाराष्ट्रातील प्रमूख बाजार समितीमध्ये नागपूर बाजार समितीत सोयाबीनला सर्वाधिक ८१५० रुपये प्रति क्विंटल भाव मिळतो आहे. याठिकाणी फक्त ३ क्विंटल सोयाबीनची आवक झाली आहे. त्यामुळे सोयाबीनला अत्यंत मजबूत असा भाव मिळाला. नागपूर बाजार समितीत कमीत कमी ८००० रुपये आणि जास्तीत जास्त ८२०० रुपये दराने सोयाबीनची खरेदी सुरु आहे. तर दुसरीकडे, जळगाव मसावत बाजार समितीत सर्वात कमी ३९५० रुपये भाव मिळतो आहे. याठिकाणी ३४ क्विंटल सोयाबीनची आवक झाली. सोयाबीनची गुणवत्ता, आर्द्रता आणि पांढऱ्या व पिवळ्या जातींनुसार दर निश्चित होत असतात.


# दुधाळ जनावरांसाठी आधुनिक आहार पद्धती



सध्या दूध उत्पादक शेतकऱ्यांना चांगले दिवस आले आहेत. उच्च दूध देणाऱ्या गाई व म्हशींच्या आहार व्यवस्थापनात युरिया मोलासेस मिनरल ब्लॉक, एक्सोजेनस एन्झाइम आणि चयापचय आणि किण्वन सुधारकाचा वापर फायद्याचा ठरतो.

यामध्ये एक्सोजेनस एन्झाइम्सचा वापर पिकांच्या अवशेषांच्या चांगल्या वापरासाठी आहे. हे एन्झाइम्स प्रामुख्याने सेल्युलोज, हेमिसेल्युलोज किंवा बुरशीजन्य असतात. एन्झाइम पावडर, दाणेदार किंवा द्रव स्वरूपात असू शकतात. ते खाण्याआधी चाऱ्यावर फवारणी केल्यास प्रभावीपणे काम करतात. एन्झाइम्स आहारात मिसळल्यामुळे रुमेनची हायड्रोलाइटिक क्षमता वाढते. वाढीसाठी आवश्यक असलेल्या सूक्ष्मजीवांची संख्या वाढते. तसेच पोषक तत्त्वांचा वापर, खाद्य कार्यक्षमता, वाढीचा दर, दुधाचे उत्पन्न आणि त्याची रासायनिक संरचना सुधारण्यासाठी जनावरांना खायला दिले जाते, इंजेक्शन दिले जाते. किण्वन सुधारक खाद्यामध्ये रुमेन किण्वन हाताळण्यासाठी वापरली जातात. रवंथ करणाऱ्या जनावरांच्या रुमेनमध्ये मोठ्या प्रमाणात फायदेशीर सूक्ष्मजीव असतात, जे खाद्याच्या तंतुमय घटकांचे पचन करण्यास मदत करतात. हिरव्या चाऱ्याच्या टंचाईच्या काळात, युरिया मोलासेस मिनरल ब्लॉक जनावरांच्या पोटाच्या रुमेन च्या भागातील सूक्ष्मजंतूंची वाढ होण्यास मदत करते. तसेच युरियाचे कमी प्रमाणात सेवन केल्याने अधिक प्रमाणात जैव-प्रथिने तयार होतात, त्यामुळे जनावराची पचनक्रिया सुधारते. नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्ड ने (एनडीडीबी) युरिया मोलॅसेस मिनरल ब्लॉक तयार करण्याची 'कोल्ड प्रोसेस' विकसित केली आहे.

# लिंबूनीच्या झाडांना लीफ मायनर कीटकांचा धोका; ही आहेत लक्षणे



देशातील शेतकऱ्यांचा फळबागा लागवडीकडे कल वाढत चालला आहे. आधुनिकीकरणामुळे फळबागांमध्ये पहिल्या तंत्राच्या तुलनेत आता जास्त कष्ट करण्याची गरज भासत नाही. कारण आधुनिक यंत्रामुळे औषध फवारणी आणि मशागत करणे सोपे झाले आहे. आधुनिक यंत्राद्वारे ही कामे केली जात असल्याने शेतकऱ्यांचा वेळ आणि पैसाही वाचत आहे. खरे तर बागायती पिके ही शेतकऱ्यांसाठी नगदी पिके आहेत. त्यांची विक्री करून शेतकऱ्यांना चांगला नफा मिळतो. या भागात गेल्या काही वर्षांत लिंबूचे उत्पादन शेतकऱ्यांमध्ये खूप लोकप्रिय झाले आहे. लिंबू हे शेतकऱ्यांचे नगदी पीक आहे. ज्याचे उत्पादन शेतकऱ्यांसाठी सोपे मानले जाते. परंतु, ते फायदेशीर करण्यासाठी, शेतकऱ्यांनी अनेक खबरदारी घेणे आवश्यक आहे. ज्यामध्ये लीफ मायनर कीटक शेतकऱ्यांसाठी लिंबू रोपासाठी आवश्यक आहे. तसे न केल्यास शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होऊ शकते. देशातील ज्येष्ठ फळ शास्त्रज्ञ डॉ. एस.के. सिंग यांच्या मते, लिंबाची रोपटी लहान असताना त्या काळात लिंबूवर्गीय पानावरील किरकोळ लिंबूवर्गीय कीटक दिसून येतो. ते म्हणाले की, ही एक प्रमुख कीड असून लिंबू, संत्रा आणि पोमेलो यांसारख्या लिंबूवर्गीय फळांच्या गटाचे ते नुकसान करते.असे करतात नुकसान : लिंबूवर्गीय लीफमायनर अळ्या लिंबाच्या झाडांच्या कोवळ्या पानांमध्ये उथळ बोगदे किंवा खोबणी बनवून स्वतःला खातात. कीटक सामान्यतः संत्री, मँडरीन, लिंबू, पेपरमिंट्स, द्राक्षे आणि इतर वनस्पतींवर आढळतात. लिंबूवर्गीय लीफमायनर ही एकमेव खाण कीटक आहे. जे सहसा लिंबू (लिंबूवर्गीय) पानांवर हल्ला करतात.

किडीची लक्षणे अशी ओळखा : लिंबूवर्गीय लीफमायनर हा एक अतिशय लहान, हलका रंगाचा कीटक आहे, जो १/४ इंचापेक्षा कमी लांबीचा आहे. यात तपकिरी आणि पांढर्या खुणा असलेले चांदीचे आणि पांढरे इंद्रधनुषी अग्रभाग आणि प्रत्येक पंखाच्या टोकावर एक वेगळा काळा डाग आहे. मागचे पंख आणि शरीर पांढरे असून मागचे पंख मार्जिनपासून पसरलेले आहेत. कीटकांच्या अळ्या फक्त लिंबाच्या पानांच्या खोडांमध्ये आणि इतर जवळच्या वनस्पतींमध्ये आढळतात, जसजशी अळी विकसित होते तसतसे ते पानाच्या पृष्ठभागावरून खाली वाहणाऱ्या शिरांच्या आत एक पातळ विष्ठा सोडते, एक पातळ रेषा म्हणून दिसते. ही विशेषता कीटक ओळखण्यात मदत करण्यासाठी वापरली जाते.

कीटक जीवन चक्र : लिंबूवर्गीय लीफमिनरच्या जीवनाच्या चार अवस्था असतात ज्यात अंडी, अळ्या, प्यूपा आणि प्रौढ कीटक यांचा समावेश होतो. प्रौढ वनस्पतींना हानी पोहोचवत नाहीत आणि फक्त १ ते २ आठवडे जगतात. प्रौढ पतंग पहाटे आणि संध्याकाळच्या वेळी सर्वात जास्त सक्रिय असतात आणि दिवसभर पानांच्या खालच्या बाजूला विश्रांती घेतात, परंतु क्वचितच दिसतात. प्युपल केस सोडल्यानंतर लगेच, मादी कीटक लैंगिक फेरोमोन उत्सर्जित करते जे नर कीटकांना आकर्षित करते. संभोगानंतर, मादी यजमान पानांच्या खालच्या बाजूला एकच अंडी घालते. झाडावर, फ्लश ग्रोथची नवीन उगवलेली पत्रके विशेषतः पसंतीची ओवीपोझिशन साइट आहेत.

किडींच्या हल्ल्यामुळे पाने सुकतात : लिंबूवर्गीय पानांची खाण लिंबूवर्गीय पिकांमध्ये अळ्या म्हणून जगू शकते. मोठी लोकसंख्या असल्याशिवाय, कडक झालेली जुनी पाने संवेदनाक्षम होत नाहीत. अळ्या नव्याने उगवलेल्या पानांच्या खालच्या किंवा वरच्या पृष्ठभागामध्ये प्रवेश करतात, ज्यामुळे ते वळण आणि विकृत होतात. या किडीचा प्रादुर्भाव झालेली पाने पिवळी पडतात, सुकतात आणि शेवटी फांद्यावर पडतात किंवा सुकतात. लिंबूवर्गीय कॅन्कर, जिवाणूजन्य रोगामुळे खाण दुखापती संसर्गाचे केंद्र म्हणून काम करतात.

किडीचे नियंत्रण कसे : देशातील ज्येष्ठ फळ शास्त्रज्ञ डॉ.एस.के.सिंग यांच्या मते, शेतकऱ्यांनी या किडीचा प्रादुर्भाव झालेली पाने गोळा करून नष्ट करावीत. पावसाळ्यात बाधित भागांची छाटणी करावी. वारंवार सिंचन आणि नायट्रोजन खतांचा जास्त वापर टाळा. अळ्या खाणीच्या आत असल्याने कीटकनाशकांच्या वापराने त्यांना सहज मारता येत नाही. तथापि, काही पद्धतशीर कीटकनाशकांच्या वापरामुळे संसर्ग काही प्रमाणात कमी होऊ शकतो.

# दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८१२ : मध्ये नेपोलियन बोनापार्ट ला रशियामध्ये मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते त्यामुळे तो फ्रांस मध्ये परत आला होता.
१८४८ : अमेरिकन संसदेसमोर केलेल्या भाषणात राष्ट्राध्यक्ष जेम्स पोल्क यांनी कॅलिफोर्नियात मोठ्या प्रमाणात सोने सापडल्याचे सांगितले.
१९०६ : नॅशनल इन्शुरन्स कंपनी ची स्थापना.
१९३२ : जर्मनीत जन्मलेले स्विस भौतिकशास्त्रज अल्बर्ट आईनस्टाईन यांना अमेरिकन व्हिसा देण्यात आला.
१९४५ : फ्लाईट १९, फ्लोरिडा येथून निघालेली अमेरिकन नौदलाची ५ टी.बी. एम. ॲव्हेंजर विमाने स्क्वॉड्रन बर्म्युडा त्रिकोणात गायब झाली.
१९४६ : भारतामध्ये होम गार्ड संघटनेची स्थापना झाली होती.
१९५० : मध्ये आताचे सिक्कीम हे राज्य भारताच्या संरक्षणाखाली आले होते.
१९५७ : इंडोनेशियाचे अध्यक्ष सुकार्नो यांनी सर्व डच नागरिकांना हद्दपार केले.
१९७१ : भारताने बांगलादेश ला एक पूर्ण रुपी देश म्हणून मान्यता दिली होती.
१९७३ : गेराल्ड फोर्ड यांनी अमेरिकेच्या ४० वे उपराष्ट्रपती म्हणून पदभार सांभाळला.
१९८९ : फ्रांसच्या टीजीव्ही रेल्वेने ताशी ४८२.४ किमी गती गाठून विश्वविक्रम केला.
१९८९ : मुलायम सिंह यादव पहिल्यांदा उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री बनले.
१९९३ : मुलायम सिंह यादव पुन्हा उत्तर प्रदेश चे मुख्यमंत्री बनले.
२००५ : ब्रिटन ने समलिंगी पुरुष आणि समलिंगी स्त्री यांचे संबंध वैध मानल्या जातील असे नवीन कायदा अमलात आणला.
२००८ : कॉंग्रेस ने अशोक चव्हाण यांना महाराष्टाचे मुख्यमंत्री बनविण्यची घोषणा केली होती.
२०१४ : जागतिक मृदा दिन.
२०१६ : गौरव गिल यांनी आशिया पॅसिफिक रॅली चॅम्पिअनशिप किताब जिंकला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८१८ : भारतीय-पाकिस्तानी कवी आणि अनुवादक जोश मलिहाबादी यांचा जन्म. (मृत्यू: २२ फेब्रुवारी १९८२)
१८७२ : भारताचे प्रसिद्ध पंजाबी लेखक, कवी, भाई वीर सिंह यांचा जन्म.
१८९४ : भारताचे माजी रेल्वे मंत्री राहिलेले एच. सी. दासप्पा यांचा जन्म
१८९७ : सेसेना एअरक्राफ्ट कॉर्पोरेशनचे संस्थापक क्लाईड व्हर्नन सेसेना यांचा जन्म. (मृत्यू: २० नोव्हेंबर १९५४)
१८९८ : भारताचे आणि पाकिस्तानचे प्रसिद्ध कवी जोश मलीहाबादी यांचा जन्म.
१९०१ : वेर्नर हायसेनबर्ग 'क्वांटम मॅकॅनिक्स'मधील मूलभूत संशोधनासाठी नोबेल पारितोषिक मिळवणारे (१९३२) जर्मन भौतिकशास्त्रज्ञ (मृत्यू: १ फेब्रुवारी १९७६)
१९०५ : शेख अब्दुल्ला - शेर ए कश्मीर (मृत्यू: ८ सप्टेंबर १९८२)
१९२७ : भुमिबोल अदुल्यतेज ऊर्फ राम (नववा) थायलँडचा राजा
१९३१ : १४ वे नौसेनाप्रमुख ॲडमिरल जयंत नाडकर्णी यांचा जन्म.
१९३२ : ला भारतीय चित्रपट सृष्टीतील अभिनेत्री नादिरा यांचा जन्म.
१९३८ : ला गुजरातचे प्रसिद्ध साहित्यकार रघुवीर चौधरी यांचा जन्म.
१९४३ : लक्ष्मण देशपांडे - 'वर्‍हाड निघालंय लंडनला' साठी प्रसिद्ध असलेले लेखक, दिग्दर्शक व प्राध्यापक (मृत्यू: २२ फेब्रुवारी २००९)
१९६५ : भारतीय फॅशन डिझायनर मनीष मल्होत्रा यांचा जन्म.
१९६९ : ला भारतीय शुटर अंजली भागवत यांचा जन्म.
१९७४ : भारतीय पत्रकार आणि लेखक रविश कुमार यांचा जन्म.
१९८५ : भारतीय क्रिकेटपटू शिखर धवन यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७९१ : वूल्फगँग मोझार्ट - ऑस्ट्रियन संगीतकार (जन्म: २७ जानेवारी १७५६)
१९२३ : फ्रेंच चित्रकार क्लोद मोने यांचे निधन.
१९२४ : ला भारताचे प्रसिद्ध सामाजिक सेवक तसेच स्वतंत्र सैनिक एस. सुब्रह्मण्य अय्यर यांचे निधन.
१९४१ : ला भारताच्या प्रसिद्ध महिला चित्रकार अमृता शेरगिल यांचे निधन.
१९४६ : प्रवचनकार दादामहाराज सातारकर यांचे निधन.
१९५० : योगी अरविंद घोष क्रांतिकारक, तत्त्वचिंतक, योगी व कवी (जन्म: १५ ऑगस्ट १८७२ कलकत्ता, पश्चिम बंगाल)
१९५१ : अवनींद्र नाथ टागोर - जलरंगचित्रकार (जन्म: ७ ऑगस्ट १८७१)
१९५५ : ला भारताचे प्रसिद्ध कवी, शायर मजाज़ यांचे निधन.
१९५९ : कुमार श्री दुलीपसिंहजी इंग्लंडचे क्रिकेटपटू, यांच्या स्मरणार्थ भारतात 'दुलीप ट्रॉफी' खेळली जाते. (जन्म: १३ जून १९०५ नवानगर, काठियावाड, गुजराथ)
१९६१ : ला परमवीर चक्राने सन्मानित गुरबचन सिंह सालारिया यांना वीरमरण.
१९७३ : राकेश मोहन - हिन्दी नाटककार (जन्म: ८ जानेवारी १९२५)
१९७३ : रडार यंत्रणेचे शोधक रॉबर्ट वॉटसन-वॅट यांचे निधन. (जन्म: १२ एप्रिल १८९२)
१९९१ : डॉ. वासुदेव विश्वनाथ गोखले - संस्कृततज्ञ आणि बौद्ध धर्माचे अभ्यासक.
१९९९ : वसंत गणेश तथा बापूसाहेब उपाध्ये - स्वातंत्र्यसैनिक, समाजवादी नेते, आमदार आणि शेती व सिंचन या विषयांतील व्यासंगी मार्गदर्शक.
२००४ : ब्राझिलियन फुटबॉलपटू ख्रिश्चन जुनियर यांचे सामना सुरु असताना बेंगलोर येथे निधन.
२००७ : राकेश मोहन - हिन्दी नाटककार म. वा. धोंड टीकाकार (जन्म: ३ आक्टोबर १९१४)
२०१३ : दक्षिण आफ्रिकेचे पहिले श्वेतवर्णीय राष्ट्राध्यक्ष नोबेल पारितोषिक विजेते नेल्सन मंडेला यांचे निधन. (जन्म: १८ जुलै १९१८)
२०१५ : ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक किशनराव भुजंगराव राजूरकर यांचे निधन.
२०१६ : तामिळ नाडू च्या मुख्यमंत्री जे. जयललिता यांचे तीव्र हृदयविकारानंतर निधन. (जन्म: २४ फेब्रुवारी १९४८).

शुक्रवार दि.५ डिसेंबर २०२५ ५
राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत





# दिव्यांग नागरिकांच्या समस्या प्राधान्याने सोडवाव्यात-जिल्हाधिकारी

जालना । प्रतिनिधी

दिव्यांग नागरिकांच्या समस्या ओळखून त्या तातडीने आणि प्राधान्याने सोडविण्यास प्रशासन कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी सांगितले. विविध शासकीय योजनांमधून दिव्यांग बांधवांना दिला जाणारा लाभ कोणत्याही परिस्थितीत विलंब न होता पोहोचला पाहिजे, अशा सूचनाही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.



आज जिल्हाधिकारी कार्यालयात जागतिक दिव्यांग दिनाचे औचित्य साधून जालना जिल्ह्यातील दिव्यांग बांधवाच्या समस्या व अडचणी जाणून घेण्यासाठी आलेल्या शिष्टमंडळाशी चर्चा करतांना त्या बोलत होत्या. यावेळी अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, जिल्हा नियोजन अधिकारी सुचित कुलकर्णी, जगदीश येनगुपटला, दिव्यांग बांधव दिपक टेहरे, अशोक जमदडे,मुन्ना दायमा, शेख अन्वर, अरबाज पठाण, संगिता कोरडे, संगिता लहाने यांची उपस्थिती होती. या बैठकीत दिव्यांग प्रमाणपत्र वितरण, सहाय्यक साधनांचे वाटप, शैक्षणिक व रोजगाराच्या संधी, अपंगत्व पेन्शन, संजय गांधीं निराधार योजना, अंत्योदय योजना, श्रावणबाळ योजना, दिव्यांग कायदा २०१६ ची प्रभावी अंमलबजावणी करणे, प्रत्येक पोलीस स्टेशन मध्ये दिव्यांग नागरिकांच्या तक्रारी जाणून घेण्यासाठी विशेष फलक लावणे, तसेच पायाभूत सुविधा सुलभ करण्याबाबत सविस्तर चर्चा झाली. दिव्यांग नागरिकांना शासकीय दालनांमध्ये येताना कोणत्याही प्रकारची अडचण येऊ नये यासाठी आवश्यक त्या सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश त्यांनी दिले. दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक मदत, शिष्यवृत्ती, विशेष शिक्षण साधने यांची उपलब्धता वाढवण्याबरोबरच रोजगाराविषयी मार्गदर्शन शिबिरे घेण्याची गरज जिल्हाधिकाऱ्यांनी व्यक्त केली. तसेच, प्रत्येक विभागाने दिव्यांगांच्या तक्रारी तात्काळ नोंदवून त्या वेळेत मार्गी लावाव्यात, असेही त्यांनी स्पष्ट केले. दिव्यांगांच्या पुनर्वसनासाठी कार्यरत असलेल्या स्वयंसेवी संस्थांनीही प्रशासनासोबत समन्वय साधून काम करावे, असे आवाहनही जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले. दिव्यांगांच्या समस्या समजून घेत त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रशासन सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी आश्वासन दिले.

# रिल्स स्टार बंटीबबली निघाली सराईत गुन्हेगार; पोलिसांनी ठोकल्या बेड्या

अहिल्यानगर । प्रतिनिधी

जिल्ह्यातील बसमधील महिलांच्या पर्स चोरीच्या वाढत्या घटनांचा पाठपुरावा करत स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कामगिरी साधली असून, रिलस्टार म्हणून प्रसिद्ध असलेली कोमल नागनाथ काळे (वय १९, रा. भिमसेननगर, शेवगाव) आणि तिचा प्रियकर सुजित राजेंद्र चौधर (वय २५, रा. निपाणी जळगाव, ता. पाथर्डी) यांना जेरबंद करण्यात आले. दोघांकडून एकूण ₹९,३५,२३० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दिनांक १९ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी ३.३० च्या सुमारास फिर्यादी सौ. अलका मुकुंद पालवे या पाथर्डी ते कल्याण एस.टी.ने प्रवास करत असताना एका अनोळखी महिलेने त्यांच्या पर्समधून सोन्याचे दागिने व रोख रक्कम लंपास केली. पाथर्डी पोलीस स्टेशनमध्ये गु.र.नं. १२७५/२०२५, भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) प्रमाणे गुन्हा नोंद झाला. या चोरीच्या वाढत्या घटना उघडकीस आणण्यासाठी मा. पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी स्थानिक गुन्हे शाखेला विशेष सुचना दिल्या. त्यानुसार पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि हरिष भोये व पथकाने तपास सुरू केला.

पथकाला माहिती मिळाली की महिला आरोपी कोमल काळे ही पाथर्डी नवीन बसस्टँड परिसरात फिरत आहे. तत्काळ सापळा रचून तिला ताब्यात घेण्यात आले. चौकशीत तिने चोरी केलेले दागिने आपल्या प्रियकराकडे दिल्याची कबुली दिली. त्यानंतर पथकाने शेवगावमधील शंकरनगर येथे जाऊन सुजित चौधरला अटक केली.

१७ (किंमत ₹१,७०,०००) मोबाईल (₹१५,०००) ६.५ तोळे सोन्याचे दागिने (₹७,४८,०००) रोख ₹२,२३० असा एकूण ₹९,३५,२३०/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. चौकशीत दोघांनी खालील दोन चोरीच्या घटनांमध्ये सहभाग कबूल केला १८/१०/२०२५ अमरापूरशेवगाव बस (गु.र.नं. ९०८/२०२५) २०/११/२०२५ पाथर्डीभिगुर बस (गु.र.नं. ९५९/२०२५) दोन्ही गुन्ह्यांची नोंद शेवगाव पोलीस ठाण्यात आहे. दोघांचा गुन्हेगारी इतिहासही भक्कम महिला आरोपी कोमल काळे हिच्याविरुद्ध बीड व अहिल्यानगर जिल्ह्यात ३ गुन्हे नोंद आहेत. तर सुजित चौधर याच्यावर दरोडा, जबरी चोरी, घरफोडी अशा गंभीर स्वरूपाचे ८ गुन्हे दाखल आहेत. सदर दोन्ही आरोपी पाथर्डी पोलीस स्टेशनच्या ताब्यात असून पुढील तपास सुरू आहे.

अटक केलेली कोमल काळे ही इंस्टाग्रामवर 'रिलस्टार' म्हणून परिचित असून तिच्या_१ या आयडीवर ५० हजारांपेक्षा जास्त फॉलोअर्स असल्याची माहिती समोर आली आहे. बसने प्रवास करताना अनोळखी व्यक्तींशी अनावश्यक संवाद टाळावा, मौल्यवान वस्तू सुरक्षित ठेवाव्यात, भाबडेपणाने कोणावरही विश्वास ठेवू नये, अशी विनंती पोलिसांनी नागरिकांना केली आहे

# धक्कादायक! बनावट दिव्यांग प्रमाणपत्राद्वारे कर्ज मिळवण्याचा प्रयत्न

## तिघांवर गुन्हा दाखल, स्वयंरोजगार बीज भांडवल योजनेत शासनाची फसवणूक

अहिल्यानगर । प्रतिनिधी

दिव्यांगांसाठी असलेल्या स्वयंरोजगार बीज भांडवल योजनेतून शेळी पालन आणि दुग्ध व्यवसायासाठी कर्ज मिळवण्याकरिता बनावट दिव्यांग प्रमाणपत्रांचा वापर केल्याप्रकरणी तीन जणांविरोधात कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जिल्हा परिषदेच्या दिव्यांग विभागाचे कनिष्ठ लिपिक सुयोग पाराजी निमसे (वय ३३, रा. शेंडी-पोखर्डी, अहिल्यानगर) यांनी मंगळवारी यासंदर्भात फिर्याद दिली आहे.

या योजनेत दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी दीड लाख रुपयांपर्यंत कर्ज दिले जाते आणि या कर्जावर शासनाकडून २० टक्के सवलत मिळते. मात्र, या सवलतीचा गैरफायदा घेण्यासाठी तिघांनी बनावटगिरीचा मार्ग अवलंबल्याचे उघड झाले आहे. संतोष रतन खरड, अनिस युनुस सय्यद आणि सविंद्र भाऊसाहेब धुमाळ (तिघेही रा. देवटाकळी, ता. शेवगाव) अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत. यातील संतोष खरड याने शेळी पालनासाठी, तर अनिस सय्यद व सविंद्र धुमाळ यांनी दुग्ध व्यवसायासाठी कर्ज मिळावे म्हणून अनुक्रमे दिनांक ३० जुलै व ३ सप्टेंबर २०२५ रोजी प्रस्ताव सादर केले होते. त्यांनी सादर केलेल्या दिव्यांग प्रमाणपत्रांबद्दल शंका आल्याने जिल्हा परिषदेच्या दिव्यांग सक्षमीकरण अधिकाऱ्यांनी जिल्हा शल्य चिकित्सकांकडून अहवाल मागवला. या अहवालात धक्कादायक माहिती समोर आली. संतोष खरड हा केवळ ७ टक्के दिव्यांग असताना, त्याने चक्क ४२ टक्के दिव्यांग असल्याचे खोटे प्रमाणपत्र सादर केले. तर, अनिस सय्यद आणि सविंद्र धुमाळ यांनी सादर केलेली प्रमाणपत्रे सिव्हिल हॉस्पिटल, अहिल्यानगर येथील नसून ती पूर्णतः बनावट असल्याचे अहवालातून स्पष्ट झाले. त्यानुसार, अनिस सय्यद व सविंद्र धुमाळ यांनी बनावट कागदपत्रे सादर करून आणि संतोष खरड याने खोटे प्रमाणपत्र देऊन शासनाची फसवणूक केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या प्रकरणी अधिक तपास कोतवाली पोलीस करत आहेत.

# शहरातील रस्ते चौक प्रायोगिक तत्वावर विकसीत करणार-आशिमा मित्तल

जालना । प्रतिनिधी

जालना शहरातील रस्ते आणि चौकांचा विकास प्रायोगिक तत्त्वावर करण्यात येणार आहे. या उपक्रमातून शहरात मोठा बदल घडवून आणण्याचे नियोजित आहे. महापालिका व सीएसआर फंडातून जालना शहरातील विविध चौक व रस्ते यांची विशिष्ट बांधणी करुन एक बदल घडवून आणणार तसेच या महत्त्वपूर्ण प्रकल्पामुळे शहरातील पायाभूत सुविधा सुधारण्यास आणि वाहतूक व्यवस्था अधिक सुरळीत होण्यास मदत मिळणार आहे. याअंतर्गत शहरातील विविध चौक आणि रस्ते यांची विशिष्ट बांधणी करून शहराचा चेहरामोहरा बदलला जाईल, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिली आहे.



जिल्हाधिकारी कार्यालयात महापालिका, जालना फर्स्ट आणि विविध उद्योजकांच्या सीएसआर फंडातून प्रायोगिक तत्वावर जालना शहरातील चौक व रस्ते बांधणीसाठी बैठक घेण्यात आली. यावेळी महापालिका उपायुक्त विद्या गायकवाड, जालना फर्स्टचे प्रतिनिधी तसेच विविध उद्योजकांची उपस्थिती होती. यावेळी त्या बोलत होत्या.

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या, शहरातील छत्रपती संभाजीनगर चौफुली ते छत्रपती शिवाजी महाराज चौक ते मोतीबागेपासून परत छत्रपती संभाजीनगर चौफुली असा एकुण १० किलोमिटरचा रस्ता प्रायोगिक तत्वावार विकसित करण्यात येणार आहे. जालना शहराच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी महापालिका आणि कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सीएसआर) फंडातून एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबविण्यात येणार आहे. महापालिका निधी आणि कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सीएसआर) फंडातून शहरातील विविध चौक व रस्ते यांची विशिष्ट पद्धतीने आणि आधुनिक बांधणी केली जाईल. हा प्रायोगिक तत्त्वावर होणारा बदल अत्यंत महत्त्वाचा असून, या अनुभवाचा उपयोग करून भविष्यात शहरातील इतर भागांमध्येही अशाच प्रकारचे उच्च दर्जाचे विकासकामे हाती घेण्याची योजना आहे. यातून जालना शहराला एक नवीन ओळख मिळवून देण्याचा प्रशासनाचा मानस आहे. तसेच यामुळे शहराचे सुशोभिकरणास ही हातभार लागणार आहे. शहराचे रूप पालटण्याच्या उद्देशाने आता प्रायोगिक तत्त्वावर शहरातील रस्ते आणि चौकांचा विकास हाती घेण्यात येणार आहे. तसेच विकसित केलेल्या चौकाची व रस्त्यांची देखभाल पुढील १० वर्षापर्यंत संबंधित संस्थांनी करणे गरजेचे आहे. असेही त्यांनी सांगितले.

# बिबट्याचा गायीवर हल्ला ; परिसरात दहशत

जालना । प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील रुई परिसरात बिबट्याच्या वाढत्या दहशतीमुळे ग्रामस्थ आणि शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतकरी पंढरीनाथ प्रभाकर राजगुरू यांच्या शेतातील गोठ्यात बांधलेल्या कालवडीवर बिबट्याने हल्ला करून तिचा फडशा पाडला. ही घटना गुरूवारी (दि.४ डिसेंबर) सकाळी उघडकीस आली. विशेष म्हणजे, गेल्या वीस दिवसांत बिबट्याच्या हल्ल्याची ही दुसरी घटना असल्याने भीतीचे सावट अधिकच गडद झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नेहमीप्रमाणे गोठ्यात बांधलेल्या कालवडीच्या दिशेने पहाटेच्या सुमारास मोठा आवाज कुटुंबीयांच्या कानावर गेला. दरम्यान घरातील लोकांनी तातडीने शेतात धाव घेतली असता कालवडीचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात पडलेला दिसला. मानेला आणि अंगावर आढळलेल्या खोल जखमा पाहता हा बिबट्याचाच हल्ला असल्याचे स्पष्ट झाले. घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे कर्मचारी वनपाल बी. एम. पाटील. वनरक्षक कैलास कदम. वनसेवक शेषराव



राठोड. संतोष राठोड. पशु वैद्यकीय अधिकारी सिद्दीकी घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून मृतदेहाची तपासणी करण्यात आली.गावातील ग्रामस्थांच्या मते, केवळ वीस दिवसांपूर्वी गावाच्या दुसऱ्या टोकाला गाईवर बिबट्याने हल्ला केला होता. त्यानंतर वनविभागाने गस्त वाढवण्याचे आश्वासन दिले होते. मात्र पुन्हा हल्ला झाल्याने शेतकऱ्यांमध्ये संताप व भीती दोन्ही वाढल्या आहेत. रात्री तर दिवसाही शेतात जाणे धोकादायक बनले असून पाळीव जनावरांना सांभाळणे कठीण होत आहे. दरम्यान, वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी माहिती दिली की, रुई परिसरात पिंजरा लावण्याची तयारी सुरू असून, बिबट्याचा शोध घेण्यासाठी पथक नियुक्त केले जाणार आहे. अंबड तालुक्यात सध्या ऊस तोडणी मोठ्या प्रमाणात सुरू असल्याने बिबट्या आणि बिबट्यासदृश प्राणी पूर्वी लपून बसत असलेल्या उसाच्या शेतांपासून बाहेर येत असल्याचेही त्यांनी सांगितले. लपण्यासाठी जागा कमी झाल्याने हे प्राणी अनेक ठिकाणी नजरेस पडत असल्याचा अंदाजही वर्तवण्यात आला आहे. वनविभागाने शेतकऱ्यांना सतर्कतेचे आवाहन केले आहे. शेतात एकटे जाणे टाळावे, शेतात जाताना आवाज करावा, घुंगराची काठी वापरावी, वाकून काम करू नये व नेहमी दक्ष राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. ''ग्रामस्थांनी काळजी घेतली तर अनर्थ टाळता येऊ शकतो,'' असेही विभागाकडून सांगण्यात आले. दरम्यान, ग्रामस्थांनी वनविभागाने तातडीने प्रभावी उपाययोजना करून बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी केली आहे.

# पदवीधरसाठी २ लाख ४० हजार मतदार नोंदणी

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

पदवीधर मतदारसंघासाठी प्रारूप मतदारयादी बुधवारी प्रसिध्द करण्यात आली. त्यानुसार मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांत एकूण २ लाख ४० हजार ५४९ मतदारांनी नावनोंदणी केली आहे. यामध्ये १ लाख ८८ हजार ७७१ पुरुष, ५१ हजार ७६३ महिला आणि १५ तृतीयपंथी मतदारांचा समावेश आहे.

विभागीय आयुक्त कार्यालयात विभागीय आयुक्त तथा मतदार नोंदणी अधिकारी जितेंद्र पापळकर, अपर आयुक्त सामान्य प्रशासन तथा सहायक मतदार नोंदणी अधिकारी मंजूषा मिसकर यांच्यासह तसेच राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते. पदवीधर मतदारसंघाची निवडणूक डिसेंबर २०२६ मध्ये होणार आहे. त्यासाठी मागील दोन महिन्यांपासून मतदार नोंदणी प्रक्रिया सुरू होती. आता बुधवारी प्रारूप मतदारयादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात एकूण ४६ हजार ४०६ पुरुष, १५ हजार ९०८ महिला व ४ तृतीयपंथी असे एकूण ६२ हजार ३१८ मतदार आहेत. जालना जिल्ह्यात एकूण २३ हजार ६४८ पुरुष, ५ हजार २७२ महिला, तर २ तृतीयपंथी असे एकूण २८ हजार ९२२ मतदार आहेत. परभणी जिल्ह्यात १६ हजार ६३५ पुरुष, ४ हजार ६४ महिला, तर १ तृतीयपंथी असे एकूण २० हजार ७०० मतदार आहेत. हिंगोली जिल्ह्यात ६ हजार ४७६ पुरुष, १ हजार ५२८ महिला असे एकूण ६ हजार ४ मतदार आहेत. नांदेड जिल्ह्यात २३ हजार ८६७ पुरुष, ६ हजार २६४ महिला, तर ४ तृतीयपंथी असे एकूण ३० हजार १३५ मतदार आहेत. लातूर जिल्ह्यात १७ हजार ४९२ पुरुष, ४ हजार ९९३ महिला, तर २ तृतीयपंथी असे एकूण २२ हजार ४८७मतदार आहे. धाराशिव जिल्ह्यात १६ हजार ७६२ पुरुष, ४ हजार ४७ महिला असे एकूण २० हजार ८०९ मतदार आहेत. बीड जिल्ह्यात ३४ हजार ४८५ पुरुष, ९ हजार ६८७ महिला, तर २ तृतीयपंथी असे एकूण ४७ हजार १७४ मतदार आहेत. विभागातील आठही जिल्ह्यांत एकूण १ लाख ८८ हजार ७७१ पुरुष, ५१ हजार ७६३ महिला, तर १५ तृतीयपंथी असे एकूण २ लाख ४० हजार ५४९ मतदार आहेत. पुढील अत्यंत महत्त्वाचा टप्पा म्हणजेच दावे व हरकती स्वीकारण्याचा कालावधी हा ०३ डिसेंबर २०२५ ते १८ डिसेंबर २०२५ असा निश्चित करण्यात आला आहे. या कालावधीमध्ये प्राप्त झालेल्या सर्व दावे व हरकती ५ जानेवारी २०२६ पूर्वी निकाली काढण्यात येणार आहेत. अंतिम मतदार यादी १२ जानेवारी २०२६ रोजी केली जाणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.

# हॉल तिकीटच मिळाले नाही; शेकडो विद्यार्थी परिक्षेला मुकले

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

लाखो रूपये शुल्क भरूनही संस्थेने परिक्षेचे हॉल तिकीट दिले नाही. परिणामी गुरुवारी (दि.४) सकाळी सुरू झालेल्या एमसीए प्रथम वर्षाच्या परिक्षेला विद्यार्थ्यांना मुकावे लागले. श्री साई इन्स्टिट्यूटच्या शेकडो संतप्त विद्यार्थ्यांनी सिडको एमआयडीसी पोलिस ठाण्यात धाव घेत ठिय्या मांडला. विद्यापीठ आणि शिक्षण संस्था यांच्या वादात विद्यार्थी मात्र भरडले गेले. वर्ष वाया जात असल्याने अनेकांना अश्रू अनावर झाले.



श्री साई इन्सिट्यूट ऑफ मॅनेजमेंट ॲन्ड रिसर्च या संस्थेचे कॉलेज सिडको आंबेडकरनगर- मिसारवाडी भागात आहे. या संस्थेत प्रवेश घेतलेल्या जवळपास १२० विद्यार्थ्यांनी लाखो रूपये शुल्क भरले. गुरुवारी सकाळी १० वाजता एमसीए प्रथम वर्षाची परिक्षा होती. त्यासाठी कालपासूनच विद्यार्थी हॉल तिकीटसाठी संस्थेच्या कार्यालयात ठाण मांडून होते. मात्र विद्यापीठाने परिक्षेचे हॉल तिकीट दिलेच नाही, असे सांगत संस्थेने हात झटकले. त्यामुळे विद्यार्थी हवालदिल झाले. सकाळी ७ वाजेपासूनच शेकडो विद्यार्थी संस्थेच्या कार्यालयासमोर जमले होते. मात्र संस्थाचालक आणि शिक्षक कार्यालयाला कुलूप लावून गायब झाले. विद्यार्थ्यासह पालकांनी संस्थेशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला. मात्र प्रतिसाद मिळाला नाही. माहितीनुसार, विद्यापीठ आणि सदर संस्थेच्या वादाचे प्रकरण कोर्टात आहे. काल (दि.३ डिसेंबर) रात्री उशीरा न्यायालयाच्या आदेशाने काही विद्यार्थ्यांना हॉल तिकीट देण्यात आले. मात्र एमसीएच्या जवळपास १०० हून अधिक विद्यार्थ्यांबाबत संस्थेने विद्यापीठाकडूनच हॉल तिकीट आले नाही असे सांगत हात वर केले. संस्था आणि विद्यापीठ यांच्या वादात शेकडो विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला लागले आहे. दरम्यान, श्री साई इन्स्टिट्यूट संस्थेला या विद्यार्थ्यांनी लाखो रूपये शुल्क भरले. परिक्षेच्या हॉल तिकीटसाठी १४२० रूपयेही जमा केले. मात्र संस्थेने हॉल तिकीटच दिले नाही. असा आरोप विद्यार्थ्यांनी केला आहे. दुसरीकडे संस्थेने विद्यार्थ्यांचे शुल्क विद्यापीठाकडे जमा केले नाही, असाही आरोप होत आहे. या वादात संस्थेशी संपर्क साधला असता कुणीही बोलायला तयार नाही. दुसरीकडे विद्यापीठाचे परीक्षा विभागप्रमुख डोळे यांच्याशी संपर्क साधला असता त्या महाविद्यालयाला परवानगी नाही. तरीही हा प्रश्न अकडामिक असल्याने संबधित विभागाशी संपर्क साधण्याचा सल्ला दिला. या बाबत प्र.कुलगुरू वाल्मिक सरोदे यांना संपर्क केला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही.

### विद्यार्थ्यांची पोलिस ठाण्यात धाव

सकाळी परिक्षा असल्याने विद्यार्थी हॉल तिकीटसाठी संस्थेच्या कार्यालयावर गेले मात्र तिथे कुलूप पाहून विद्यार्थ्यांसह पालकही संतप्त झाले. त्यांनी थेट सिडको एमआयडीसी पोलिस ठाणे गाठले. ठाण्यात गेल्यावरही पोलिस अधिकारी गायब असल्याचे दिसून आले.

# लातूर- नांदेड महामार्गावर कारची ट्रकला धडक; २ तरुण ठार




लातूर । प्रतिनिधी

लातूर- नांदेड राष्ट्रीय महामार्गावरील चेवले ऑटोमोबाईल समोर नांदेडकडे जाणाऱ्या मालवाहू ट्रकला पाठीमागून कारने धडक दिल्याने झालेल्या अपघातात दोन युवक जागीच ठार झाले. ही घटना मध्यरात्री १.३० वाजता घडली. हा अपघात इतका भीषण होता, की ट्रकमध्ये अडकलेली क्रेटा कार क्रेनच्या सहाय्याने ओढून काढावी लागली. व त्यानंतर कटरच्या सहाय्याने कारचा दरवाजा कापून मृतदेह बाहेर काढले.

या भीषण अपघातात रवी दराडे व चिऊ ऊर्फ सागर ससाणे हे दोन तरूण जागीच ठार झाले आहेत. या बाबत पोलीसांकडून मिळालेली माहिती अशी, की अहमदपूर येथील लातूर- नांदेड राष्ट्रीय महामार्गावरील चेवले ऑटोमोबाईल समोर लातूरहून नांदेडकडे जाणाऱ्या (के.ए.३२ डी.०९५६) या मालवाहू ट्रकला (एम.एच.२४ ए.टी.-९७७७) या क्रेटा कारने पाठीमागून जोरदार धडक दिली. ही धडक इतकी जोरदार व भीषण होती की कारचा समोरचा संपूर्ण भाग ट्रकच्या पाठीमागील भागात घुसला. त्यात कार जाऊन अडकली. या घटनेत शहरातील इंदिरा नगर येथील चिऊ ऊर्फ सागर ससाणे व कराड नगर येथील रवी दराडे या दोन युवकांचा जागीच मृत्यू झाला आहे. या घटनेचा तपास अहमदपूर पोलीस करत आहेत.

# वैश्विक ओळखपत्र सादर न करणारे बोगस १४ अपंग शिक्षक निलंबित

**बीड । प्रतिनिधी**

दिव्यांग प्रमाणपत्राच्या आधारे शासनाच्या विविध सवलतीचा लाभ घेणाऱ्या शिक्षकांच्या बाबतीत अनेक तक्रारी प्राप्त झाल्यानंतर त्यांची पडताळणी करण्यासाठी दिव्यांग कल्याण विभागाच्या वतीने दिनांक ८ ऑक्टोबर २०२५ रोजी एक पथक नेमले होते. मात्र शिक्षकांना कळवूनही त्यांनी आपले अपंग प्रमाणपत्र तसेच वैश्विक ओळखपत्र यावेळी सादर केले नाही. अनेक वेळा कळवूनही हे प्रमाणपत्र सादर न करण्यात आल्याने गैरशिस्तीचे वर्तन केल्याने या १४ शिक्षकांवर शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे. तथापि या चौदा शिक्षकांना सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.



बीड जिल्ह्यातील अनेक शिक्षकांच्या बाबतीत बोगस दिव्यांग प्रमाणपत्राच्या आधारे दिव्यांगांच्या सवलती लाटत असल्याच्या तक्रारी दिव्यांग कल्याण विभागाकडे आल्यानंतर या प्रमाणपत्राच्या तपासणीसाठी एक पथक नेमण्यात आले. मात्र या पथकाला या शिक्षकांनी अपंग प्रमाणपत्र किंवा वैश्विक ओळखपत्र सादर केले नाही. त्यामुळे बीड तालुक्यातील चौसाळा शाळेतील श्रीमती उषा विठ्ठल माने , रामचंद्र छत्रगुण भोसले, गवळी वस्ती शाळेतील अंजली मारुतीराव मुंडे, गांधीनगर शाळेतील शैला साहेबराव देवगुडे ,येळंबघाट शाळेतील आश्रुबा विश्वनाथ भोसले , या सह शिक्षकांना तसेच केज तालुक्यातील हादगाव शाळेतील रवींद्र धोंडीबा जाधव, आष्टी तालुक्यातील डोईठाण शाळेतील श्रीमती कल्पना गेनू चोपडे, अंबाजोगाई तालुक्यातील मोरेवाडी शाळेतील हेमंत कारभारी शिनगारे, तसेच जोडवाडी येथील मनोज नरसिंगराव सूर्यवंशी, शिरूर तालुक्यातील रायमोहा शाळेतील संजीवनी विक्रम कंठाळे, परळी तालुक्यातील राधाकृष्णनगर सिरसाळा येथील सय्यद नवाज मौलासाहब, पाटोदा तालुक्यातील भोपळे वस्ती ◀◀ पान २ वर

# गंगाई–बाबाजी राज्यस्तरीय आदर्श पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठवा –प्राचार्य डॉ.दत्तात्रय वाघ

आष्टी । प्रतिनिधी

यंदाचे गंगाई– बाबाजी रौप्य महोत्सवी वर्ष आहे. गंगाई– बाबाजी राज्यस्तरीय आदर्श पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठवण्याचे आवाहन संयोजन समितीने केले आहे.गंगाई – बाबाजी राज्यस्तरीय आदर्श पुरस्कारासाठी प्रस्ताव धार्मिक क्षेत्र,सामाजिक क्षेत्र,कृषी क्षेत्र , साहित्य क्षेत्र,पत्रकारिता , शैक्षणिक क्षेत्र,आदर्श तलाठी, आदर्श ग्रामसेवक, आदर्श कलाकार, क्रीडाक्षेत्र ,विधी,



आदर्श माता– पिता,आदर्श सरपंच, प्राणी मित्र आदी क्षेत्रातील मान्यवरांनी आपले प्रस्ताव दि.२० डिसेंबर २०२५ पर्यंत पाठवावेत असे आवाहन गंगाई– बाबाजी रोप्य कला महोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

मानवी जीवनामध्ये खऱ्या अर्थाने सर्वांगीण प्रगती आणि संस्कारक्षम जीवन जगण्यासाठी सर्वांच्या सहकार्याची आणि सुसंस्कृत आचार विचारांची देवाणघेवाण आवश्यक आहे. आष्टी तालुक्यातील सर्वोत्कृष्ट संस्कारक्षम उपक्रम म्हणून गंगाई–बाबाजी कला मोहोत्सव याचा उल्लेख करण्यासम आहे.गंगाई –बाबाजी कला महोत्सवाची गेल्या २४ वर्षाची परंपरा आहे. गोरगरीब, दीनदलीत,दुबळ्या, अनाथ,अपंग, शेतकरी,शेतमजूर आणि वंचित घटकांसह ऊसतोड कामगारांच्या मुलांना शैक्षणिक प्रवाहात आणून नवी क्रांती करण्याचे काम हा महोत्सव गेली २४ वर्षापासून करत आहे.

## हरीबाई थेटे यांचे निधन

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील पवारवाडी येथील हरीबाई विश्वनाथ थेटे यांचे दि.३ डिसेंबर बुधवार रोजी



सांय ७:३० वाजता अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ८० वर्ष होते. त्यांच्या पार्थिवावर दि.४ डिसेंबर गुरूवार रोजी सकाळी १० वाजता पवारवाडी येथील त्यांच्या घराजवळील शेतमळ्यात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात तीन मुले,सुना,नातवंडे असा परिवार आहे. पवारवाडी येथील प्रगतिशील शेतकरी मोतीराम थेटे,आसाराम थेटे यांच्या त्या आई होत.

# परळी थर्मलच्या पाणी पुरवठ्याची पाईपलाईन फुटली, पिकांचे नुकसान, वस्तीतही शिरले पाणी

**परळी । प्रतिनिधी**

तालुक्यातील आवलगाव शिवारातील व्यंकटी तांड्याजवळ परळी थर्मलला पाणी पुरवठा करणारी महानिर्मिती कंपनीची पाईपलाईन बुधवारी सकाळी ९ वाजता फुटली. यामुळे लाखो लिटर पाणी वाहून गेल्याने परिसरातील शेतीसह पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

गोदावरी नदीवरील खडका बंधाऱ्यावरून परळी येथील थर्मल प्रकल्पाला पाणी पुरवठा केला जातो. दरम्यान आवलगाव शिवारातील व्यंकटी तांडा शिवारात ही पाईपलाईन फुटल्यामुळे पाण्याचा प्रचंड वेग थेट शेजारील शेतांमध्ये शिरला. १५ ते २० फुट उंच पाण्याचे फवारे उडाले. यामुळे संबंधित शेतकऱ्यांच्या शेतातील कांदा आणि हरभरा पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून माती देखील पाण्यासोबत वाहून गेली. केवळ शेतामध्येच नाही तर व्यंकटी तांड्यावरील घरांमध्येही पाणी घुसल्याने घरातील संसारउपयोगी साहित्याचे नुकसान झाले. त्यामुळे शेतकरी, रहिवाशांकडून नुकसान भरपाईची मागणी होत आहे. तालुक्यातील आवलगाव शिवारात व्यंकटी तांड्याजवळील गोविंद बबनराव फंड यांच्या ◀◀ पान २ वर






# हसन पटेल यांच्यावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील नागापूर खुर्द येथील रहिवासी असलेले अनेक वर्ष नागापूर या गावचे पोलीस पाटील राहिलेले स्वर्गीय केशर काकू व माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचे खंदे समर्थक हसन खान पठाण उर्फ हसन पटेल यांचे बुधवारी रात्री दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्यावर गुरुवारी दुपारी दोन वाजता नमाज नंतर अत्यंत शोकाकुल वातावरणात त्यांच्या राहत्या गावी नागपूर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



बीड तालुक्यातील नागापूर खुर्द येथील पोलीस पाटील आणि माजी खासदार स्वर्गीय केसर काकू तसेच माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचे खंदे समर्थक आणि क्षीरसागर घराण्यावर निष्ठा असलेले हसन खान पठाण यांचे बुधवारी रात्री दीर्घ आजाराने निधन झाले .मृत्यू समयी त्यांचे वय ९० वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी असा परिवार आहे. नागपूरचे उपसरपंच अलीम खान पठाण, बीड कृषी उत्पन्न बाजार समितीचे सेवानिवृत्त सचिव हरून खान पठाण, करीम खान पठाण यांचे ते वडील होते. त्यांच्यावर गुरुवारी दुपारी नमाज नंतर त्यांच्या राहत्या गावी नागापूर खुर्द येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी बीड तालुक्यातील मोठ्या संख्येने नागरीक, गावातील ग्रामस्थ, नातेवाईक, मित्रपरिवार आणि राजकारणातील सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्री क्षेत्र येवलवाडी येथील जालिंदरनाथ मंदिरात चोरी

पाटोदा । प्रतिनिधी

तालुक्यातील श्री क्षेत्र येवलवाडी येथील प्रसिद्ध जालिंदरनाथ मंदिरात चोरट्यांनी धुमाकूळ घातलाय. गुरुवारी मध्यरात्री साधारण १.३० वाजताच्या सुमारास तीन चोरटे मंदिरात घुसले आणि दोन दानपेट्या उचलून नेल्या. चोरट्यांचा संपूर्ण कारनामा सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे.



**चोरीचा संपूर्ण कारनामा सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद**

मंदिर परिसरात अंधाराचा फायदा घेत चोरटे शांतपणे आत शिरले. आधी परिसराची पाहणी करून त्यांनी दानपेट्या तोडल्या आणि काही सेकंदांतच संपूर्ण ऐवज घेऊन फरार झाले. कॅमेऱ्यात दिसणाऱ्या फुटेजमध्ये तीनही चोरटे चेहऱ्यावर कपडा बांधून हलचाल करताना दिसत आहेत, त्यामुळे त्यांची ओळख पटवणे आव्हानात्मक ठरणार आहे.

**५० लाखांचा ऐवज चोरीला गेल्याचा अंदाज**

मंदिरातील दानपेट्यांमध्ये ५० लाखांच्या आसपासचा ऐवज जमा असावा, असा प्राथमिक अंदाज देवस्थान समितीने व्यक्त केला आहे. त्यामुळे चोरीची रक्कम मोठ्या प्रमाणात असण्याची भीती अधिकच वाढली आहे.

**पोलिसांची कारवाई सुरू**

पोलिसांनी घटनास्थळी दाखल होऊन पंचनामा आणि तपास सुरू केला आहे. परिसरातील इतर सीसीटीव्ही फुटेज, संशयितांचा हालचालींचा मागोवा तसेच मोबाईल लोकेशन आदींच्या आधारे पोलिस तपासाची दिशा निश्चित करतील.

**मंदिराच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह**

मंदिरावर वारंवार चोरीच्या घटना होत असल्याने स्थानिकांमध्ये संतापाची भावना आहे. गावकऱ्यांनी पोलिसांनी तातडीने आरोपींना अटक करून चोरी गेलेला ऐवज परत मिळवावा, अशी मागणी केली आहे.





**आष्टी : शहरातील गुरु दत्तात्रय मंदीरात दत्त जयंती साजरी होत आहे यावेळी लोकनेते आमदार सुरेश आण्णा धस यांच्या धर्म पत्नी प्राजक्ता ताई धस यांच्या उपस्थितीत हा उत्सव संपन्न झाला यावेळी ह भ प. सुजाता क्षिरसागर (मुळे) यांनी भगवान दत्तात्रयाच्या चारित्र्यावर नारदीय कीर्तन सादर केले यावेळी मोठ्या प्रमाणावर भाविक भक्त उपस्थित होते. छाया शरद रेडेकर**

## शिरूर तालुक्यात बाललैंगिक अत्याचार

शिरूर । प्रतिनिधी

एका १४ वर्षीय मुलीला धमकावून तिच्यावरती अत्याचार केल्याची घटना शिरूर तालुक्यातील एका गावामध्ये घडली आठवडाभर पूर्वी घडली असून याप्रकरणी बुधवार दि.३ डिसेंबर रोजी सायंकाळी शिरूर पोलीस स्टेशन मध्ये २४ वर्षीय आरोपीच्या विरोधात शिरूर पोलीस स्टेशनमध्ये पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आरोपीला अटक ही करण्यात आली आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक खांडकुळे हे करत आहेत.

## उस आंदोलनातील विजयी युवा शेतकरी संघर्ष समितीचा नानासाहेब घोडके यांच्या पुढाकाराने भव्य सत्कार सोहळा

माजलगाव । प्रतिनिधी

उस दरवाढीसाठी उसळलेल्या आंदोलनात तरुणांनी दाखवलेली आक्रमकता, नेतृत्व आणि लढवय्या वृत्तीची अखेर कारखानदाराने अखेर दखल घेतली. या युवा शक्तीला सलाम करण्यासाठी राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने माजलगाव मध्ये रविवारी दिनांक ०७ डिसेंबर रोजी भव्य सत्कार सोहळयाचे आयोजन करत आहे.आंदोलनात झालेला तडाखेबाज सहभाग आणि तरुणांची शिस्तबद्ध एकजूट या सोहळ्याचे मुख्य आकर्षण ठरणार आहे.सोहळ्याचे उद्घाटन नितीन नाईकनवरे (माजी सभापती, कृ.उ.बा.समिती) यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थानी डॉ. ओमप्रकाश शेटे, राज्य प्रमुख आयुष्यमान भारत मिशन, उपस्थित राहणार आहेत. उस आंदोलनाला धार देत मैदानात आघाडीवर



लढलेले अजय राऊत,ॲड. नारायण गोले पाटील,कॉ. मोहनराव जाधव,योगेश कानडे,जगदीश फरताडे,तुकाराम नावडकर,कॉ. कृष्णा सोळंके,शुभम माने,नामदेव सोजे पाटील,विजय दराडे,नितीन कचरे यांचा विशेष सत्कार केला जाणार आहे.कार्यक्रमात विश्वांबर थावरे राष्ट्रवादी शरद पवार गट तालुकाध्यक्ष, बालाजी मारगुडे कार्यकारी संपादक,मनोज जगताप कृ ऊ.बा.सदस्य, जयदत्त नरवडे कृ ऊ.बा.अध्यक्ष, प्रशांत मोरे माजी सरपंच,अनंत घाटुळ युवा नेते यांची उपस्थिती सोहळ्याला वेगळे वजन देणार आहे; तर सत्यनारायण उनवणे रा.च.म.माजी कार्याध्यक्ष,रामप्रभू सोळंके माजी जि.प.स.सभापती, हारीभाऊ सवने कृ उ स सचिव,ॲड. गणेश गवळी युवा प्रदेश उपाध्यक्ष, सुनील शिंदे ◀◀ पान २ वर

# सिद्धेश्वर संस्थानचे मठाधिपती विवेकानंद शास्त्रींची महामंडलेश्वरपदी नियुक्ती

शिरूर । प्रतिनिधी

येथील सिद्धेश्वर संस्थान मठाधिपती महंत स्वामी विवेकानंद शास्त्री यांची न्यायाचार्य महंत नामदेव शास्त्री यांनी महामंडलेश्वर पदी नियुक्ती केली आहे. ते आता संन्यास घेणार असून सिद्धेश्वर संस्थानसाठी कारभारासाठी विवेकानंद शास्त्रीच्या मार्गदर्शनाखालीच एक कीर्तनकार, व्यवस्थापक नियुक्त करणार असल्याचे महंत नामदेव शास्त्री यांनी जाहीर केले आहे.







धाकटी अलंकापुरी श्री.क्षेत्र सिद्धेश्वर संस्थान येथे सुमारे १६ वर्षांपूर्वी वै. आबादेव महाराज यांच्या वैकुंठगमनानंतर श्रीक्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती महंत नामदेव महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली विवेकानंद शास्त्री यांची या ठिकाणी मठाधिपती म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. गेल्या सोळा वर्षाच्या कार्यकाळामध्ये स्वामी विवेकानंद शास्त्री यांनी संस्थान मोठ्या प्रमाणात विकास केला आहे. त्याचबरोबर शिरूर शहरासह पंचक्रोशीतील भाविक भक्तांना ही जोडण्याची मोठे कार्य केले आहे. यामुळे पंचक्रोशीतील भाविक भक्त आणि महाराज यांची मोठी नाळ जुळली होती.

श्री.क्षेत्र भगवान गडाचे मठाधिपती महंत नामदेव महाराज शास्त्री यांनी आपल्या गुरूंच्या मुंबई कांदेवली येथील अध्यात्मिक नावलौकिक असलेल्या एका संस्थानच्या महामंडलेश्वर पदावर नियुक्ती करून कारभार सांभाळण्याची मोठी जबाबदारी टाकण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे निश्चितच स्वामी विवेकानंद शास्त्रींना सिद्धेश्वर संस्थान वरून संन्यास घेण्याचे स्पष्ट झाले आहे. यामुळे स्वामी विवेकानंद आणि पंचक्रोशीतील भाविक भक्त यांच्यात दुरावा निर्माण झाला असल्याची भावना भाविकांच्या मनामध्ये दिसून येत आहे. शिरूर शहरासह पंचक्रोशीतील भाविक भक्तांना महंत नामदेव शास्त्री यांचा हा निर्णय दुःख देणारा, अंतकरणामध्ये निश्चितच वेदना निर्माण करणारा झाला आहे. स्वामी विवेकानंद यांच्या बरोबर भाविकांची जुळलेली नाळ, गेल्या सोळा वर्षात एकमेकाबद्दल आपुलकी आणि ◀◀ पान २ वर

# ट्रकवर टेम्पो धडकला; चालक ठार–दोन जखमी

बीड । प्रतिनिधी

जालन्याहून हुमनाबादकडे सळई घेऊन जाणाऱ्या भरधाव ट्रकने रस्त्यावर पंक्चर झालेल्या खताच्या टेम्पोला जोरदार धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात टेम्पो चालक जागीच ठार झाला, तर दोनजण जखमी झाले.

हा अपघात बुधवारी सकाळी साडेआठच्या सुमारास लोखंडी सावरगावजवळील बीड राज्य महामार्गावर घडला. मृत टेम्पो चालकाची ओळख ज्योतीराम सदाशिव जाधव (वय ४३, रा. लक्ष्मी टाकळी, ता.पंढरपूर, जि. सोलापूर) अशी झाली असून, एमएच–११ एएल– ६३७५ क्रमांकाचा खताचा टेम्पो पंक्चर झाल्याने रस्त्याच्या कडेला उभा होता. दरम्यान, केए–५६–६८५६ क्रमांकाचा सळई भरलेला ट्रक वेगात येत पाठीमागून टेम्पोवर आदळला. धडकेचा इतका जोर होता की टेम्पो रस्त्याच्या कडेला असलेल्या खड्ड्यात जाऊन पलटी झाला. टेम्पो खाली चिरडल्याने चालक ज्योतीराम जाधव यांचा जागीच मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच अंबाजोगाई ग्रामीण पोलिसांचे पोलिस निरीक्षक मुरलीधर खोकले, सहनिरीक्षक डॉ. चंद्रकांत जगताप, बीट अंमलदार पी. एस. ऊळे, राहुल भोसले यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी अंबाजोगाई येथील स्वाराती रुग्णालयात पाठवण्यात आला. जखमींना तात्काळ उपचारासाठी हलवण्यात आले असून, पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे.

# उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांची डॉ. गौरी पालवे–गर्जे आत्महत्याप्रकरणी उच्चस्तरीय चौकशीची मागणी

मुंबई । प्रतिनिधी

डॉ. गौरी पालवे–गर्जे यांच्या संशयास्पद मृत्यूप्रकरणी निर्माण झालेल्या संतापाच्या पार्श्वभूमीवर विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीस पीडितेचे आई–वडील तसेच प्रख्यात सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया उपस्थित होत्या. भेटीनंतर माध्यमांशी बोलताना डॉ. गोऱ्हे यांनी या प्रकरणात गंभीर विसंगती असून त्या मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिल्याचे



सांगितले. तपासावर कोणताही दबाव नसल्याचे मुख्यमंत्री यांनी स्पष्ट केले असून, कोणताही हस्तक्षेप सहन करणार नसल्याचेही त्यांनी ठामपणे सांगितले.

डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले की, कुटुंबीयांनी मांडलेल्या मुद्द्यांनुसार ही आत्महत्या नसून खून असू शकतो, असा संशय त्यांनी व्यक्त केला आहे. संबंधित प्रकरणात भारतीय न्याय संहिता कलम ८५ ( कलम ४९८अ )अंतर्गतही गुन्हा दाखल असून, छळ आणि मानसिक अत्याचाराचा स्पष्ट उल्लेख आहे. डॉ. गोऱ्हे यांनी या संदर्भात मुख्यमंत्र्यांना लेखी निवेदन सादर केले असून, तपासाची देखरेख एक महिला आयपीएस अधिकारी यांनी करावी, अशीही विनंती करण्यात आली आहे. डॉ. गोऱ्हे यांनी म्हटले की, ‘‘डॉ. गौरीसारख्या सुशिक्षित, विद्वान मुलींचे अशाप्रकारे मृत्यू होणे ही केवळ व्यक्तिगत शोकांतिका नसून सामाजिक वेदना आहे. मी उपसभापती, स्त्री आधार केंद्राची अध्यक्षा आणि एक आई म्हणून अत्यंत संतप्त आहे.‘‘ एक डिसेंबर रोजी त्यांनी पीडित कुटुंबीयांची भेट घेतली होती, त्यानंतर पुन्हा मुंबईत परतून त्यांनी याबाबत शासन पातळीवर पाठपुरावा केला.

डॉ. नीलम गोऱ्हे यांनी मुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनातील महत्त्वाचा आशय :

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, डॉ. गौरी पालवे गर्जे यांच्या मृत्यूमुळे राज्यभर तीव्र दुःख व असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. कुटुंबीयांच्या आरोपांनुसार दीर्घकाळ मानसिक ◀◀ पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पुणे-नाशिक रेल्वेचा जुनाच मार्ग कायम राहणार ? अमोल कोल्हेंच्या मागणीवर केंद्राने दिले संकेत

**शिरूर । प्रतिनिधी**

पुणे - नाशिक रेल्वेची जुनीच अलाइन्मेंट कायम ठेवावी, अशी मागणी लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी केली आहे. खोडद (जुन्नर) परिसरातील जीएमआरटी मुळे पुणे - नाशिक रेल्वेचा मार्ग बदलण्याचा घाट घातला जात आहे. त्यावर बोलताना जगभरात १५ देशात रेडिओ टेलिस्कोप प्रकल्पाच्या परिसरातून रेल्वे जात आहेत.



या तंत्रज्ञानाचा अभ्यास करून हा प्रकल्प जुन्याच मार्गाने करता येईल असे खासदार कोल्हे यांनी सांगितले. त्यावर उत्तर देताना रेल्वेमंत्री वैष्णव यांनी या प्रकल्पांची माहिती घेऊन आपण निर्णय घेऊ असे सांगितले.खासदार डॉ. कोल्हे यांनी पुरवणी प्रश्नात जुन्नर, आंबेगाव तालुके निर्यातक्षम कृषी उत्पादन घेणारे तालुके आहेत. त्यामुळे पुणे - नाशिक रेल्वे मार्गामुळे या भागाचा आर्थिक विकास होऊ शकतो. जीएमआरटी प्रकल्पामुळे जुन्नर व आंबेगाव तालुक्यात औद्योगिक विकास होऊ शकत नाही. दोन्ही तालुके भारतातच असून त्यांना विकासाचा हक्क नाही का? असा प्रश्न विचारला. जुन्नर आंबेगाव दोन तालुक्यातील विकासातील कमतरता, त्रुटी कशाप्रकारे दूर करणार असा प्रतिप्रश्न विचारला.

यावर रेल्वेमंत्री वैष्णव यांनी गती शक्ती योजनेंतर्गत दोन्ही तालुक्यांना नव्या अलाईन्मेंटला जोडण्याचा विचार करता येईल, असे सांगितले.तळेगाव ते उरळीकांचन नवीन रेल्वे लाइनला स्थानिक शेतकऱ्यांचा विरोध असेल तर सर्वांशी चर्चा करून पर्यायी मार्ग काढता येईल, अशी सकारात्मक भूमिका केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी घेतली असल्याचे डॉ.अमोल कोल्हे यांनी सांगितले.

# पुण्याहून थेट 'अबू धाबी'साठी नवी आंतरराष्ट्रीय विमानसेवा सुरू; पहिल्याच दिवशी १७३ प्रवाशांनी केला प्रवास

**पुणे । प्रतिनिधी**



पुण्याहून आता अबू धाबीसाठी नवीन आंतरराष्ट्रीय विमानसेवा सुरू करण्यात आली आहे. या विमानसेवेद्वारे पहिल्याच दिवशी १७३ प्रवाशांनी पुण्यातून अबू धाबीसाठी आंतरराष्ट्रीय प्रवास केला आहे. यावरून आगामी काळात या सेवेला आणखी प्रतिसाद मिळणार आहे, असे चित्र दिसत आहे.

पुणे विमानतळाच्या आंतरराष्ट्रीय कनेक्टिव्हिटीला आणखी एक महत्त्वाचा टप्पा वाढला आहे. यापूर्वी पुण्याहून सिंगापूर, दुबई आणि बँकॉक या तीन ठिकाणी आंतरराष्ट्रीय विमानसेवा सुरू होत्या. त्यात आता आणखी एक अबू धाबी ही आंतरराष्ट्रीय विमानसेवा सुरू झाली आहे. ही सेवा दर मंगळवार, गुरुवार आणि शनिवार या दिवशी रात्री ९ वाजून १० मिनिटांनी पुण्याहून अबू धाबीकडे रवाना होणार आहे. या नव्या मार्गामुळे पुण्याच्या नागरिकांसह व्यावसायिक, उद्योजक, विद्यार्थ्यांना आणि मध्यपूर्वेत कार्यरत असलेल्या हजारो कामगारांना मोठा दिलासा मिळणार आहे.

केंद्रीय मंत्री आणि पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ म्हणाले, पुणेअबूधाबी थेट उड्डाणाची सुरुवात ही शहराच्या वाढत्या आंतरराष्ट्रीय महत्त्वाची साक्ष देणारी आहे. मध्यपूर्वेशी कनेक्टिव्हिटी वाढल्याने व्यापार, उद्योग, पर्यटन, गुंतवणूक आणि रा पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या दूरदृष्टीमुळे देशातील विमानतळ विकासाला आणि आंतरराष्ट्रीय कनेक्टिव्हिटीला अभूतपूर्व गती मिळाली आहे.

# श्री दत्तनामाच्या जयघोषांनी श्री क्षेत्र नारायणपूर दुमदुमले

**पुरंदर । प्रतिनिधी**

जय जय गुरुदेव दत्ता। अत्रेय अनुसये सुता। अत्रेय अनुसये सुता जय जय गुरुदेव दत्ता आशा गजरात पुरंदर तालुक्यातील श्रीक्षेत्र नारायणपूर येथील श्री दत्त मंदिरात श्री दत्तजन्म सोहळा भाविकांच्या अलोट गर्दीत पार पडला. यानंतर जन्मसोहळा होऊन नाव ठेवण्याचा कार्यक्रम झाला. दिगंबरा दिगंबरा, श्रीपाद वल्लभ दिगंबरा च्या जयघोषात संपूर्ण परिसर भक्तिरसात तल्लीन झाला होता.



श्रीक्षेत्र नारायणपूर येथे (दि.२) पासून दत्त जयंती सोहळ्यास सुरुवात झाली आहे. परमपूज्य श्री सद्गुरू नारायणमहाराज यांच्या आशीर्वादाने व परमपूज्य श्री पोपटमहाराज टेबे स्वामी यांच्या आधिपत्याखाली व व्यवस्थापक भरत क्षीरसागर यांच्या व्यवस्थेत हा दत्त जयंतीसोहळा सकाळी उत्सव मूर्तींना अभिषेक घालून आरती करून नैवेद्य दाखवण्यात आला. यानंतर दुपारी जिल्ह्यातून चालत आलेल्या ४५ दिंड्या मंदिरात घेऊन त्यांचे स्वागत करून त्या दिंड्यातील मानाच्या दिंड्यांचा सत्कार करण्यात आला.

मंदिरात दत्त मूर्तीस फुलांची सजावट करण्यात आली होती. सायंकाळी पोपट महाराज यांचे दत्त जन्म सोहळ्याबाबत प्रवचन होऊन सात वाजून तीन मिनिटांनी जन्म सोहळा पार पडला. त्यानंतर फुले उधळण्यात आली. पाळणा होऊन सुंठवडा वाटण्यात आला. शासनाच्या वतीने सर्व सुविधा पुरविण्यात आल्या होत्या. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शासनातर्फे उपविभागीय अधिकारी वर्षा लांडगे, तहसीलदार विक्रम राजपूत, पोलीस निरीक्षक कुमार कदम आदी अधिकारी उपस्थित होते. आमदार विजय शिवतारे, उल्हास पवार, दादा वेदक, विक्रम जैन, रानधीश मध्यप्रदेश, महादेव जाधव, कलकत्ता, प्रकाश बाफना, एम. के. गायकवाड, बबनराव टकले. डॉ. उमेश डोंगरे, तात्यासाहेब भिंताडे, तानाजी घारे, माजी सरपंच रामभाऊ बोरकर, चंद्रकांत बोरकर आदी उपस्थित होते.

# विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या बसची धडक; पाच वर्षांच्या चिमुरड्याचा अंत; आई जखमी

**पुणे । प्रतिनिधी**

विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या बसच्या धडकेत पाच वर्षीय बालकाचा जागीच मृत्यू झाला, तर त्याची आई गंभीर जखमी झाली असल्याची घटना हडपसर-सासवड रस्त्यावरील उरुळी देवाची परिसरात घडली आहे. यामुळे परिसरातून हळहळ व्यक्त केली जात आहे.




या प्रकरणी बसचालक आणि मोडक इंटरनॅशनल स्कूलच्या संस्थापकांसह चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. साईनाथ तुळशीराम भंगारे (वय ५, रा. गणराज हाईट, उरुळी देवाची) असे अपघातात मृत्युमुखी पडलेल्या बालकाचे नाव आहे. त्याची आई रेखा तुळशीराम भंगारे (वय २८) गंभीर जखमी झाल्या असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. या प्रकरणी बसचालक संस्कार अनिल भोसले (रा. पांडवनगर, वडकी) याला अटक करण्यात आली आहे. तसेच शाळेचे संस्थापक संजय वसंत मोडक, मुख्याध्यापिका डॉ. आरती जाधव आणि बस मालक मनीषा संजय मोडक या चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# बेट भागातील 'त्या' बिबट्याला जेरबंद करण्यात वनविभागाला यश

**शिरुर । प्रतिनिधी**

तालुक्याच्या बेट भागात बिबट्याच्या हल्ल्यामुळे झालेले तीन निष्पाप जीवांचे दुर्दैवी मृत्यू आणि त्यानंतर वाढलेल्या दहशतीवर नियंत्रण मिळवण्यासाठी वनविभागाने ठोस पाऊले उचलली आहेत. या साखळीतील यश म्हणून, आज गुरुवारी (दि.०४) रोजी पहाटेच्या सुमारास पिंपरखेड (ता.शिरुर) येथील आंबेवाडी परिसरात एका नर बिबट्याला जेरबंद करण्यात वनविभागाला यश आले आहे. हा बिबट्या मागील आठवडाभरापासून पशुधनावर हल्ले करत होता आणि पिंजऱ्याला दोन वेळा हुलकावणी देऊन भक्ष फस्त करत असल्याने परिसरामध्ये भीतीचे वातावरण पसरले होते.



शेतकरी रामदास देवका बोंबे यांच्या शेतात लावलेल्या पिंजऱ्यात हा सुमारे पाच वर्षीय नर बिबट्या अडकला. या बिबट्याला जेरबंद केल्यामुळे परिसरातील नागरिकांनी आणि शेतकऱ्यांनी सुटकेचा निःश्वास सोडला आहे. रोहन बोंबे यांच्या मृत्यूनंतर वनविभागाकडून नरभक्षक बिबट्याला दुसऱ्याच दिवशी ठार करण्यात आले होते. त्यानंतर रेस्क्यू टीमच्या सहाय्याने काही बिबट्यांना बेशुद्ध करण्यात आले, तसेच विविध भागात पिंजरे लावून अनेक बिबट्यांना बंदिस्त करून त्यांची माणिकडोह (जुन्नर) येथे रवानगी करण्यात आली आहे.

सहायक वनसंरक्षक स्मिता राजहंस यांनी दिलेल्या माहितीनुसार, धुमाकूळ घालून दहशत निर्माण करणाऱ्या या बिबट्याला माणिकडोह (जुन्नर) येथे रवानगी करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, मागील दोन महिन्यांत पिंपरखेड, जांबूत, फाकटे (ता.शिरुर) या गावांतून सुमारे २० बिबट्यांना जेरबंद करण्यात वनविभागाला मोठे यश आले आहे. बिबट्यांची वाढलेली संख्या आणि त्यांचा मानवी वस्तीमधील वावर कमी करण्यासाठी वनविभाग सातत्याने प्रयत्नशील आहे. ज्या भागात बिबट्यांचा वावर जास्त आहे, त्या ठिकाणी पिंजरे लावण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. जुन्नरचे उपवनसंरक्षक प्रशांत खाते यांच्या मार्गदर्शनाखाली, सहायक वनसंरक्षक स्मिता राजहंस यांच्या सूचनेनुसार शिरुरचे वनपरिक्षेत्र अधिकारी नीलकंठ गव्हाणे, वनरक्षक लहू केसकर आणि महेंद्र दाते हे या सर्व कारवायांमध्ये सक्रिय सहभाग घेत आहेत.

# विवाहाचे आमिष दाखवून तरुणीवर अत्याचार; आरोपी अटक

**पुणे । प्रतिनिधी**

विवाहाच्या आमिषाने तरुणीवर अत्याचार केल्याप्रकरणी एकाला लोणीकंद पोलिसांनी अटक केली. श्रीकांत बाळासाहेब शिंदे (वय २५, रा. मातोश्री निवास, शेजवळ पार्क, चंदननगर, मूळ रा. आडगाव, जि. नाशिक) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. याप्रकरणी, एका २५ वर्षीय तरुणीने लोणीकंद पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित तरुणी आणि आरोपी शिंदे याची वर्षभरापूर्वी ओळख झाली होती. आरोपीने तरुणीला विवाहाचे आमिष दाखवून तरुणीला जाळ्यात ओढले. त्याने तरुणीवर लैंगिक अत्याचार केला. दरम्यान, तरुणीने विवाहाबाबत विचारणा केल्यानंतर त्याने नकार दिला. फसवणूक झाल्याचे उघडकीस आल्यानंतर त्याला अटक करण्यात आली.

पोलिस उपनिरीक्षक बेंदगुडे तपास करत आहेत. दरम्यान, विवाहाच्या आमिषाने महिलेवर बलात्कार केल्याप्रकरणी कोंढवा पोलिसांनी एकाविरुद्ध गुन्हा दाखल केला. याबाबत एका महिलेने कोंढवा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली असून, पोलिस उपनिरीक्षक गावडे तपास करत आहेत.

# मुद्रांक शुल्क माफी योग्यच! 'अमेडिया'कडून २१ कोटींची नोटीस अमान्य

**पुणे । प्रतिनिधी**

कोरेगाव पार्क येथील शासकीय जागेच्या खरेदीप्रकरणात घेतलेली मुद्रांक शुल्क माफी पूर्णपणे नियमात बसणारी असल्याचा दावा उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार संचालक असलेल्या 'अमेडिया' कंपनीने नोंदणी विभागासमोर केला आहे. विभागाने २१ कोटी रुपये भरण्याबाबत बजावलेली नोटीसही कंपनीकडून अमान्य करण्यात आली आहे. कंपनीचे म्हणणे नोंदविल्यानंतर पुढील पाच ते सात दिवसांत अंतिम निर्णय नोंदणी आणि मुद्रांक शुल्क विभाग घेणार आहे.

गेल्या महिन्यात 'अमेडिया' कंपनीकडून महारवतनातील ४० एकर जागेचा व्यवहार झाल्याचे समोर आल्याने हा मुद्दा गाजला होता. जमिनीची किंमत कमी दाखवून मुद्रांक शुल्काची बचत केल्याचा आणि उद्योग संचालनालयाकडून २१ कोटींची माफी मिळवल्याचा आरोप या व्यवहारावर झाला. त्यानुसार विभागाने 'अमेडिया'चे भागीदार




दिग्विजसिंह पाटील आणि जागेच्या कुलमुखत्यारपत्रधारक शीतल तेजवानी यांना ७ नोव्हेंबर रोजी नोटीस बजावली होती. व्यवहार रद्द करण्यासाठीची २१ कोटी आणि माफीपोटीची २१ कोटी, अशा एकूण ४२ कोटींची रक्कम जमा करण्याची मागणी या नोटिशीत करण्यात आली होती. उत्तरासाठी प्रारंभी १६ नोव्हेंबरपर्यंत मुदत दिली होती. त्यानंतर कंपनीने १४ नोव्हेंबर रोजी मुदतवाढ मागितल्याने २४ नोव्हेंबरपर्यंत वेळ देण्यात आली. मात्र, पुन्हा मुदतवाढ अर्ज आल्यानंतर ४ डिसेंबरपर्यंत अंतिम मुदत वाढवण्यात आली. त्यानुसार गुरुवारी दिग्विजसिंह पाटील यांच्या वतीने वकिलांनी नोंदणी आणि मुद्रांक शुल्क विभागासमोर आपले म्हणणे सविस्तर मांडले. या सुनावणीत २१ कोटींची माफी योग्य असल्याचा दावा कंपनीकडून करण्यात आला. २१ कोटींच्या वसुलीबाबतची नोटीसही अमान्य असल्याचे सांगत वकिलांनी लेखी अर्ज जमा केला.

# शासकीय जागेची होणार तपासणी! अहवाल सादर करण्याचे जिल्हाधिकारींचेआदेश

**पुणे । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील देवस्थान, वतन, आदिवासी, शासनाने कब्जेहक्काने अथवा भाडेतत्त्वावर दिलेल्या जमिनीची तपासणी तहसीलदार यांच्यामार्फत सुरू करण्यात आली आहे. अटी-शर्तींनुसार त्यांचा वापर सुरू आहे का, की शर्तभंग झाला आहे, यांची तपासणी होणार आहे.मुंढवा येथील बॉटेनिकल गार्डनची जागा, बोपोडी येथील कृषी विभागाची, तर ताथवडे येथील पशुसंवर्धन विभागच्या जागेच्या व्यवहार संदर्भातील गैरप्रकार उघडकीस आले आहेत.



गेल्या काही वर्षांत जमिनीचे दर मोठ्या प्रमाणावर वाढले आहेत. त्यामुळे परवानगी न घेताच अशा जमिनीचे व्यवहार केले जात असल्याचे प्रकार दिवसेंदिवस उघडकीस येत आहेत.या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी या संदर्भात अशा सर्व जमिनींची तपासणी करून अहवाल सादर करण्याचे आदेश तहसीलदार यांना दिले आहेत.वर्ग दोनच्या जागेची तपासणी ही जागेवर प्रत्यक्ष जाऊन केली केली जाणार आहे. तपासणीमध्ये ज्या साली ही जागा शासनाकडून देण्यात आली आहे. ती देताना कोणत्या अटी-शर्ती शर्ती घालण्यात आल्या होत्या. त्या अटी-शर्तीनुसार जागेचा वापर होतो आहे का की अन्य वापर सुरू आहे, ती भाड्याने त्रयस्थ व्यक्तीला देण्यात आली आहे का, जागेची परस्पर व्यवहार झाला आहे का, अशा सर्व गोष्टींची तपासणी करण्यात येणार आहे. तसेच प्रत्यक्ष जागेवर पंचनामे करण्यात येणार आहेत.

# हायकोर्टाचा तो निर्णय पूर्णपणे चुकीचा; प्रकाश आंबेडकरांचा न्यायव्यवस्थेच्या निर्णयावर आक्षेप

**पुणे । प्रतिनिधी**

उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने नगरपालिका निवडणुकींची मतमोजणी लांबणीवर टाकण्याचा दिलेला निर्णय चुकीचा आहे.संविधानानुसार निवडणूक प्रक्रियेत कोणत्याही कोर्टाला हस्तक्षेपाचा अधिकार नसल्याचे स्पष्ट मत वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी पत्रकार परिषदेत मांडले.



सर्वोच्च न्यायालयाने हस्तक्षेपास नकार दिला असताना उच्च न्यायालयाने हा निर्णय कसा दिला, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.राज्यातील पालिकांच्या निवडणुकांचा निकाल ३ डिसेंबरला जाहीर होणार होता. याला नागपूर खंडपीठाने स्थगिती दिली असून आता २१ डिसेंबरला मतमोजणी होणार आहे. यामुळे २० डिसेंबरपर्यंत आचारसंहिता लागू राहणार आहे. या निर्णयावर आंबेडकर यांनी संताप व्यक्त केला.यावेळी वंचित बहुजन आघाडीचे पुणे शहराध्यक्ष ॲड.अरविंद तायडे उपस्थित होते.राजकीय पक्षांनी तुरुंगात जाण्याची भीती बाळगू नये, असे आवाहन करत ते म्हणाले, निवडणूक जाहीर करण्याचा अधिकार केवळ निवडणूक आयोगाला आहे. २१ डिसेंबरच्या मतमोजणीला काहीच महत्त्व राहिलेले नाही.

चिन्ह वाटपाबाबत जिल्हा स्तरावरील न्यायालयाला सुनावणीचा अधिकार आहे. तो अधिकार उच्च न्यायालयाला नाही. निवडणूक आयोगाने जाहीर केलेला कार्यक्रम पुढे ढकलल्यामुळे नव्याने होणारी निवडणूक प्रक्रिया आणि जुन्या प्रक्रियेतील गॅझेट प्रसिद्धीचे एकत्रीकरण कसे होणार याबाबत घटनात्मक पेचप्रसंग निर्माण होत आहे. या प्रकरणात निवडणुक आयोगाने स्वतः न्यायालयात जाऊन रद्द झालेली मतमोजणी तात्काळ पुन्हा सुरू करावी. मुख्य न्यायमूर्तींनी लक्ष घालून थांबवलेली मतमोजणी पुन्हा सुरू करावी, अशी मागणी आंबेडकर यांनी केली आहे.

# सिंहगडमध्ये १० हून अधिक बिबट्यांचा वावर, कुत्री-गाय-वासरांचा फडशा

**पुणे । प्रतिनिधी**


बिबट्यांच्या वाढत्या हल्ल्यामुळे सिंहगडसह पानशेत भागातील नागरिकांमध्ये दहशत वाढली आहे. सिंहगड परिसरात १० पेक्षा अधिक बिबटे तसेच बछडे असल्याचे स्थानिक शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. सिंहगड पायथ्याच्या गोऱ्हे खुर्द, घेरा सिंहगड, थोपटेवाडी, मालखेड, खाटपेवाडी, खरमरी आदी ठिकाणी बिबट्यांनी कुत्री, वासरे, गायी अशा जनावरांचा फडशा पाडला आहे. परिणामी नागरिकांसह पर्यटकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

गेल्या दोन ते तीन महिन्यांपासून सिंहगड भागातील नागरी वस्त्या, कंपन्या, फार्म हाऊस आदी ठिकाणी बिबट्यांचा वावर वाढला आहे. त्यामुळे वन विभागाने तातडीने आवश्यक उपाययोजना सुरू कराव्यात, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे कार्यकर्ते धनराज जोरी व स्थानिक शेतकऱ्यांनी केली आहे. याबाबत जोरी यांनी सिंहगड वन विभागाला निवेदन दिले आहे. या वेळी स्थानिक शेतकरी उपस्थित होते. मालखेड येथील वेंकी कंपनी, तसेच जवळील उसाच्या शेतात बिबट्याची एक मादी व एक बछडा अधूनमधून येत असल्याचे स्थानिक रहिवाशांनी सांगितले. पानशेत वन विभागाचे वनरक्षक राजेंद्र निंबोरे हे वेल्हे येथून रांजणे पाबे घाट रस्त्याने खानापूर येथे येत असताना सोमवारी (दि. १) सायंकाळी साडे सात वाजण्याच्या सुमारास मणेरवाडी येथील तिरंगा हॉटेलजवळ एक बिबट्या रस्ता ओलांडताना दिसला. सिंहगड, पानशेतच्या जंगलात धष्टपुष्ट व आकाराने मोठे असलेले बिबटे आहेत. त्यामुळे बिबटे लहान जनावरांसह म्हैस, गायी, चितळ सांबर अशा मोठ्या जनावरांची शिकारही करत आहेत.

# २ लाख दे नाही तर अत्याचाराचा गुन्हाच दाखल करते; पुण्याच्या कथित महिला वकिलाचा आणखी एक प्रताप

**पुणे । प्रतिनिधी**

चंदगड येथील एका व्यक्तीवर अत्याचाराचा प्रयत्न करून, फोटो व्हायरल करण्याची धमकी देत दोन लाखाची खंडणी मागणाऱ्या महिलेवर मुंढवा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यापुर्वी या महिलेवर कोथरुड पोलिस ठाण्यात खंडणीचा गुन्हा दाखल आहे.



याप्रकरणी, मुंढवा येथील ३७ वर्षीय व्यक्तीने मुंढवा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार संबंधीत ३८ वर्षीय महिलेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा प्रकार १५ सप्टेंबर ते १ डिसेंबर २०२५ दरम्यानच्या कालावधीत बीटी कवडे रोड घोरपडी येथे घडला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी तरुणासोबत या महिलेने ओळख वाढविली. त्या हायकोर्टात वकील असल्याचे सांगून फिर्यादीवर त्यांच्या पत्नीने दाखल केलेल्या केसेसमध्ये मदत करते, असे सांगून जवळीक साधली. फिर्यादी यांनी लग्नास नकार दिला म्हणून फिर्यादी व त्यांच्या आईला कॉल करुन अश्लिल शिवीगाळ केली. तू माझ्या सोबत लग्न कर अथवा मला २ लाख रुपये दे, नाहीतर मी तुझ्यावर बलात्काराचा गुन्हा दाखल करते, म्हणून धमकी दिल्याचे फिर्यादी यांनी म्हटले आहे.

दरम्यान, हा प्रकार घडल्यानंतर फिर्यादीने याबाबत मुंढवा पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती. त्यानुसार पोलिसांनी आरोपी महिलेवर खंडणीचा गुन्हा दाखल केला असून सहायक पोलीस निरीक्षक राजू महानोर तपास करीत आहेत.